13 Nov 2026_Layout 1 11/12/2026 10:46 PM Page 1

नोव्हेंबर/November
शुक्रवार/Friday
दि.१३/Dt: 13
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ८ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २३/Issue 23 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीड उपविभागीय कार्यालयात कंत्राटी भरतीचा महाघोटाळा?

► बीड प्रशासनात आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय; कंत्राटी भरतीचे गुपित लपवण्यासाठी आरटीआय कायदा पायदळी

उद्या फाईल्स गहाळ झाल्या तर खापर कोणावर फुटणार?

प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त होणाऱ्या भीतीनुसार, जर या कार्यालयात उद्या एखाद्या मोठ्या घोटाळ्याची फाईल गायब झाली, अभिलेखांमध्ये फेरफार झाला किंवा गोपनीय माहिती बाहेर फुटली, तर या बेकायदेशीररीत्या ठेवलेल्या खाजगी ऑपरेटर्सवर कोणतीही कायदेशीर कारवाई करणे कठीण जाईल. अशा वेळी संबंधित वरिष्ठ अधिकारी हात वर करून मोकळे होतील का? की या सर्व बेकायदेशीर कारभाराला पाठीशी घालणारे जनमाहिती अधिकारी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी आणि स्वत: उपविभागीय अधिकारी याला जबाबदार धरले जातील? ज्या ऑपरेटर्सच्या नियुक्तीचा आदेशच प्रशासन दाखवू शकत नाही, ते ऑपरेटर कोणत्या अधिकाराखाली शासकीय दस्तऐवज हाताळत आहेत? उद्या एखाद्या सामान्य शेतकऱ्याची किंवा नागरिकाची महत्त्वाची फाईल गायब झाली आणि मोठा आर्थिक घोटाळा झाला, तर त्याला पूर्णपणे बीडचे उपविभागीय प्रशासन आणि तिथले जबाबदार अधिकारीच कारणीभूत असतील.का?



जिल्हाधिकारी साहेब, या मुजोर अधिकाऱ्यांना वेसण घालणार का?

एकीकडे शासन पारदर्शक कारभाराचे ढोल बडवत असताना, दुसरीकडे बीडच्या उपविभागीय कार्यालयात माहिती अधिकाराचा गळा घोटला जात आहे. स्वत: प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीनंतरही माहिती देण्यास असमर्थ ठरत असतील, तर सामान्य जनतेने न्यायासाठी कोणाकडे पाहावे? जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कंत्राटी भरतीची चौकशी करावी आणि माहिती दडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.



बीड/जगमित्र न्यूज

बीडच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयात सध्या कायद्याचे राज्य सुरू आहे की अधिकाऱ्यांची मनमानी, असा संतप्त सवाल सामान्य नागरिक आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत कार्यालयात नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी ऑपरेटर्सच्या भरतीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय बळावला असून, हा भ्रष्टाचार दडपण्यासाठी चक्क माहिती अधिकार कायदा २००५ पायदळी तुडवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका माहिती अधिकार कार्यकर्त्याने १५ मे २०२६ रोजी बीड उपविभागीय अधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करून खालील माहिती मागवली होती. जानेवारी २०२५ ते मे २०२६ या कालावधीत एकूण किती कंत्राटी ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आली? नियुक्त केलेल्या सर्व ऑपरेटर्सच्या नावांची यादी. ही भरती कोणत्या बाह्यस्त्रोत कंपनीमार्फत किंवा शासन निर्णयाद्वारे झाली, त्या आदेशाची छायांकित प्रत. माहिती कायद्यानुसार ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक असतानाही प्रशासनाने जाणीवपूर्वक वेळकाढूपणा केला. अखेर २२ जून २०२६ रोजी प्रथम अपील दाखल करण्यात आले.

सुनावणी होऊन दोन महिने उलटले, तरीही माहिती मिळेना; मुजोर अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी वेसण घालणार का?

अपिलाची सुनावणी होऊनही दोन महिने उलटूनही अद्यापपर्यंत अर्जदाराला माहिती देण्यात आलेली नाही. माहिती मागितल्यानंतर कार्यालयातील जबाबदार अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवून अर्जदाराची दिशाभूल करत आहेत. जनमाहिती अधिकारी शशिकांत ठेंगे हे सहाय्यक जनमाहिती अधिकारी निलेश बागडे यांच्याकडे बोट दाखवतात; तर निलेश बागडे हे पुन्हा ठेंगे यांच्याकडे किंवा प्रथम अपिलीय अधिकारी कविता जाधव यांना भेटण्याचा सल्ला देतात. वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या या टोलवाटोलवीमुळे कार्यालयात ''आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय'' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. नियमाप्रमाणे आणि पारदर्शकपणे भरती झाली असेल, तर मग माहिती देण्यास अधिकारी इतके का घाबरत आहेत? कंत्राटी ऑपरेटर्सच्या या भरतीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाणघेवाण होऊन मोठा घोटाळा झाला असल्याचा थेट संशय आता व्यक्त केला जात आहे. हीच अनियमितता लपवण्यासाठी माहिती दडपली जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

वरिष्ठ अधिकारीच जर माहिती अधिकार कायदा पायदळी तुडवत असतील, तर कनिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कायद्याची भीती कशी उरणार? तक्रार अर्जांची दखल घेतली जात नाही आणि माहिती अधिकारात माहिती मिळत नाही, त्यामुळे बीड प्रशासनात भ्रष्टाचार बोकाळला असून याला सर्वस्वी प्रशासनच जबाबदार आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते

बीड जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये केवळ ११ टक्के पाणीसाठा शिल्लक; माजलगाव धरणात १९.७१ टक्के उपयुक्त साठा

बीड/जिमाका

बीड जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांचा १२ नोव्हेंबर २०२६ रोजीचा पाणीसाठा अहवाल प्राप्त झाला आहे. या अहवालानुसार संपूर्ण बीड जिल्ह्यातील जलप्रकल्पांमध्ये सद्यस्थितीत केवळ ११.११ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प असलेल्या माजलगाव धरणाची उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३१२ दशलक्ष घनमीटर असून आजमितीस या धरणामध्ये ६१.५ दशलक्ष घनमीटर म्हणजेच १९.७१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

मागील आठवड्याच्या तुलनेत या साठ्यात घट झाली असून गेल्या आठवड्यात हा साठा ६५ दशलक्ष घनमीटर इतका होता. बीड जिल्ह्यातील एकूण १७ मध्यम प्रकल्पांची उपयुक्त पाणीसाठा क्षमता १६७.०४ दशलक्ष घनमीटर असून सध्या या प्रकल्पांमध्ये केवळ १३.६६ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ८.१८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या मध्यम प्रकल्पांपैकी ऊर्ध्व कुंडलिका धरणात १५.८७ टक्के, कुंडलिका धरणात १७.३७ टक्के, मेहकरी धरणात १२.४० टक्के, तर वाण धरणात ११.४१ टक्के उपयुक्त साठा उपलब्ध आहे. बिंदुसरा आणि सिंदफणा या धरणांमध्ये अनुक्रमे केवळ २.८१ व ०.३८ टक्के पाणीसाठा असून बेलपारा, महासांगवी, कडा, कडी आणि रुटी यांसह अनेक मध्यम प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील १४६ लघु प्रकल्पांची एकूण पाणीसाठा क्षमता २८८.४९ दशलक्ष घनमीटर असली तरीही आजघडीला या सर्व लघु प्रकल्पांमध्ये मिळून फक्त १०.१२ दशलक्ष घनमीटर म्हणजेच अवघा ३.५१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. एकूणच जिल्ह्यातील सर्व (पान २ वर)

लोबकळणाऱ्या वीजतारांच्या ठिणगीने ऊस पेटला; आरणवाडीत लाखोंचे नुकसान!

सरपंच भागवत शिनगारे यांचा ऊस जळून खाक; अन्य दोघांचे ठिबक संचही जळाले

धारूर/अतुल शिनगारे

धारूर तालुक्यातील आरणवाडी येथे लोबकळणाऱ्या विद्युत तारांमधून पडलेल्या ठिणगीमुळे उसाच्या शेताला आग लागून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या आगीत गावचे सरपंच भागवत शिनगारे यांचा ऊस फड जळून खाक झाला, तर नामदेव शिनगारे आणि पोपट शिनगारे यांच्या उसाच्या शेतातील ठिबक सिंचन (पान २ वर)



गुटक्याला खाकीची साथ!

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांना ऊत!!

पीआय या आशीर्वादाने पात्रूडमध्ये बाबू नामक व्यक्तीची गुटखा तस्करी जोमात

माजलगाव/बाळासाहेब आडागळे

पोलिसांच्या वरदहस्ताने माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बोकाळल्याचा आरोप होत असून जुगार, मटका, गुटखा, अवैध दारू यांसह विविध अवैध धंदे राजरोसपणे सुरू असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. विशेष म्हणजे पात्रूड येथे बाबू नामक व्यक्तीकडून परिसरात गुटखा तस्करीला ऊत आला असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जात आहे. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पीआयंच्या कारभारावरही आता (पान २ वर)



आ.अर्जुनराव खोतकर यांच्या मागणीला एकनाथराव शिंदेंचा सकारात्मक प्रतिसाद


१२४६ कोटीच्या समांतर पाणीपुरवठा योजनेला मान्यता देण्याचे आश्वासन

जालना/प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे भोजपुरी येथे शेतकऱ्यांच्या शेतात शेतकऱ्यांच्या झोपडीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी भाजी भाकरी खाऊन दिवाळी साजरी केली यादरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी शेतकऱ्यांना तसेच लाडक्या बहिणींना धीर देत या दुष्काळात शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन दिले.

सदरील दौरा यशस्वी करण्यासाठी आमदार अर्जुन रावजी खोतकर यांच्या पायाला दुखापत असताना सुद्धा त्यांनी युवा नेते अभिमन्यू खोतकर





संपर्क नेते भास्करराव आंबेकर पंडित दादा भुतेकर शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम यशस्वी केला आहे.

अंबडमार्गे नव्हे, जालन्यासाठी स्वतंत्र समांतर जलवाहिनी; सन २०६० पर्यंतच्या ७.७३ लाख लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्याचे दीर्घकालीन नियोजन जालना मतदार संघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे.

जालना शहराचा अनेक वर्षांपासून भेडसावणारा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शिवसेना उपनेते, माजी मंत्री तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शासनस्तरावर सुरू केलेल्या पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण गती मिळाली आहे. शहराच्या (पान २ वर)

मंठ्यात गॅस एजन्सी आणि हॉटेलचालकांचे साटेलोटे?

सामान्य ग्राहकांना टाकीसाठी प्रतीक्षा, खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर घरगुती सिलिंडरचा सर्रास वापर!

मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरात घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, एकीकडे सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे, तर दुसरीकडे शहरातील हॉटेल आणि खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांवर घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रास वापर होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकारामुळे इंडियन गॅस एजन्सीच्या वितरण व्यवस्थेवरच संशयाचे ढग निर्माण झाले आहेत.

मंठा शहरातील हॉटेल बिकानेर तसेच शहराच्या मुख्य मार्गावरील विविध खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांवर घरगुती गॅस सिलिंडर वापरले जात असल्याचा आरोप सामान्य ग्राहकांकडून होत आहे. घरगुती वापरासाठी असलेले सिलिंडर व्यावसायिक कारणांसाठी उपलब्ध होत असतील, तर त्यामागे नेमकी कोणाची मेहरबानी आहे? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सामान्य ग्राहकांना सिलिंडरसाठी प्रतीक्षा, व्यावसायिकांना सहज पुरवठा? सर्वसामान्य कुटुंबांना घरगुती गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. मात्र हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे घरगुती सिलिंडर उपलब्ध होत असल्याचे चित्र दिसत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. मग घरगुती ग्राहकांच्या हक्काच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा नेमका कुठे वळवला जात आहे? वितरण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष का होत आहे? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.

पुरवठा विभाग झोपेत आहे का? (पान २ वर)

परळीतील मोंढा मार्केट परिसरातील पाणीप्रश्न सुटणार

नवीन पाईपलाईनचे उद्घाटन उत्साहात संपन्न!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील मोढा मार्केट परिसरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांची अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली पाणीपुरवठ्याची समस्या लक्षात घेऊन नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात येत असून, या कामाचा शुभारंभ नुकताच मान्यवरांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. या नवीन पाईपलाईनमुळे परिसरातील पाणीपुरवठ्याची समस्या दूर होण्यास मदत होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



मोढा मार्केट परिसरातील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली पाणीपुरवठ्याची समस्या लक्षात घेऊन नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यात येत असून, या कामाचा शुभारंभ नुकताच पार पडला आहे. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा नगरसेवक (पान २ वर)

13 Nov 2026 page 2_Layout 1 11/12/2026 11:11 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक जगमित्र विशेष संपादकीय

बेभरवशी बाणा !

मतुमच्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाहीफ, ही भावना राजकीय विरोधक, पत्रकार अशा अनेकांनी सरकारबाबत व्यक्त केलेली असेल आणि सरकारनेही त्याकडे आपल्या यशस्वी शैलीनुसार दुर्लक्ष केले असेल. पण देशाचे सर्वोच्च न्यायालयच या शब्दांत केंद्र सरकारला खडसावते तेव्हा त्याची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. ती जशी सरकारने घ्यायला हवी तशीच, विवेक शाबूत असलेल्या नागरिकांनीही घ्यावयास हवी. त्यासाठी हे प्रकरण समजून घ्यायला हवे. आतापर्यंत विद्यमान सरकारला अनेकदा न्यायालयीन शब्दछडीचा प्रसाद मिळाला. मग मुद्दा मबुलडोझर न्यायाफ्चा असेल अथवा मजामीन हा नियम, तुरुंगवास हा अपवादफ हा सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा घालून दिलेला नियम असेल. सरकारने विरोधक वा सव्यसाची पत्रकारांस द्यावी तशी वागणूक न्यायालयासही दिल्याचे अनेक प्रसंग घडले. परंतु न्यायालयाने सरकारला मतुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही,फ अशा शब्दांत खडसावावे इतकी वेळ आली नव्हती. आता तेही झाले. देशाच्या आर्थिक राजधानीत, मुंबईत अर्थमंत्री निर्मला सीतारामन परदेशी गुंतवणूकदारांस आकृष्ट करण्याचे प्रयत्न करत असताना त्याच शहरातील उच्च न्यायालय शहराच्या महापौर आणि सत्ताधार्यांस नि:संदिग्ध शब्दांत ठणकावते आणि तिकडे राजधानी दिल्लीत सर्वोच्च न्यायालय सरकारच्या विश्वासार्हतेची अब्रू चव्हाट्यावर आणते. या दोन घटना सद्य:स्थितीचा आरसा ठरतात. सर्वोच्च न्यायालयातील मुद्दा वेदांत ही भारतीय आणि रव्वा ऑइल ही सिंगापूरमध्ये स्थापन झालेली कंपनी या दोन कंपन्या आणि भारत सरकार यातील मतभेदांचा आहे. तसाच तो त्या मतभेदांवर निघालेल्या न्यायालयीन तोडग्याकडे सरकार कसे दुर्लक्ष करत आले त्याचाही आहे. याचा परिणाम असा की गेली तब्बल २६ वर्षे हे प्रकरण सरकारच्या आडमुठेपणामुळे निकालात निघू शकलेले नाही. ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आले असता न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला वरील शब्दांत खडसावले. यात भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा प्रश्न असल्याने हे प्रकरण समजून घ्यायला हवे.

झाले असे की केंद्र सरकारने १९९४ सालच्या ऑक्टोबरात कृष्णा-गोदावरी खोर्यातील रव्वा येथे खनिज तेल क्षेत्र विकसित करण्यासाठी वर उल्लेखलेल्या कंपनी समूहाशी करार केला. हा करार तर झाला; पण त्यानुसार हाती लागलेल्या ऊर्जा स्रोतांच्या विक्रीतून नफा झाल्यास तो कसा वितरित करावयाचा याबाबत मतभेद झाले. त्यास सिंगापूर-स्थित कंपनीने मलेशियातील लव-ादासमोर आव्हान दिले. तशी तरतूद मूळ करारात होती आणि गुंतवणूकदार कंपनी सिंगापुरातील असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर दाद मागितली जाणे अनपेक्षित नव्हते. त्यावर २००४ सालच्या ऑक्टोबरात मलेशियन लवादाने अंतरिम निकाल दिला आणि त्यानंतर १२ वर्षांनी २०१६ साली ऑक्टोबरात अंतिम निकाल देऊन हे प्रकरण निकाली काढले गेले. केंद्र सरकारने या वादात सदर सिंगापुरी कंपनीकडून ९.९ कोटी डॉलरची नुकसानभरपाई मागितली होती. ती या लवादाने फेटाळली. त्यास मलेशियाच्या उच्च न्यायालयातही आव्हान दिले गेले. तेही त्या न्यायालयाने फेटाळले. उभयतांनी या कंपन्या भारताच्या मतेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाफ्स काहीही अधिक देणे लागत नाहीत, असा निवाडा दिला. त्यास केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे दिल्ली उच्च न्यायालयानेही केंद्राची मागणी धुडकावून लावली. दिल्ली उच्च न्यायालयात सरकारने भलताच दावा केला. लवादाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची अंतिम मुदत संपुष्टात आल्याचे कारण सरकारने पुढे केले. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. जसमित सिंग यांनी सरकारचा हा दावाही अमान्य केला. दरम्यान, २०१४ साली केंद्राने रव्वा ऑइल कंपनीकडे ६.४० कोटी डॉलर आणि त्यांची भागीदार कंपनी असलेल्या मवेदांतफ्कडे ९.९ कोटी डॉलर्स नुकसानभरपाई मागितली. ती अर्थातच अमान्य झाली. वास्तविक दिल्ली उच्च न्यायालयात फटका खाल्ल्यानंतर तरी केंद्र सरकारने झाले तितके पुरे असे म्हणत प्रकरण सोडून द्यायला हवे होते. पण असे थांबणे केंद्र सरकारला मंजूर नसावे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशास केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशात बदल करण्याची काहीही गरज नाही, असा निवाडा त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिला आणि तेथे न्या. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. ममउच्च न्यायालयाच्या निकालात कोणतीही त्रुटी नाही. कायद्यांचा अर्थ लावण्याबाबत तर अजिबातच काही चूक नाहीफ्फ असे अत्यंत स्पष्टपणे नमूद करून न्यायमूर्तीद्वयांनी या कंपन्यांची देणी का तुम्ही लांबवत आहात असे सरकारला विचारले. ममअंमलबजावणीच्या वेळेस तुम्ही निवाडा कसे मानत नाहीफ्फ, हा न्यायालयाचा सरकारला प्रश्न. तो विचारताना युक्तिवाद करून वेळ काय वाया घालवता, असेही सरकारला न्यायालयाने खडसावले. प्रश्न तेथे संपत नाहीत. भारत सरकारकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचा उल्लेख करत न्यायाधीशांनी सरकारच्या धोरणांबाबत प्रश्न उपस्थित केले. ममतुम्ही आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांस आम्ही यंव करू, त्यंव करू असे सांगता आणि प्रत्यक्षात वैकल्पिक लवादाच्या निकालाकडे दुर्लक्ष करता: तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीफ्फ, इतक्या स्वच्छपणे सरकारची कानउघाडणी केली. आता यानंतर तरी सरकार लवाद आणि न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करते किंवा काय हे दिसेलच. पण जे झाले त्यामुळे सरकारी दफ्तरदिरंगाई आणि आडमुठी नोकरशाही आपल्या विकासाच्या आड कशी येत असते ही बाबही पुन्हा उजेडात येते. सदरहू प्रकरण ३२ वर्षांपासून अनिर्णित आहे. त्यातील पहिल्या लवादाचा निवाडा येऊनही २२ वर्षे सरली. या प्रकरणी लवादाने अंतिम निवाडा दिला त्यासही १० वर्षे उलटून गेली. तरी प्रकरणाचे भिजत घोंगडे तसेच्या तसेच. या पार्श्वभूमीवर मलेशियन लवादाची तत्परता वाखाणण्याजोगी म्हणायची. या लवादासमोर हे प्रकरण २००४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सादर झाले आणि १२ ऑक्टोबरला तेथे कंत्राटाबद्दलचा अंतरिम निवाडा लागलाही. त्यावरील अपिलावर मलेशियन न्यायालयानेही पाच वर्षांत अंतिम निर्णय दिला. त्यातूनही काही होत नाही असे दिसल्यावर या कंपन्यांनी पुन्हा लवादाचा दरवाजा ठोठावला. त्यासाठी नवीन लवाद स्थापन केला गेला. त्याचा निकाल २०१६ सालच्या ऑक्टोबरात आला. तरीही भारत सरकारने त्याची अंमलबजावणी करणे हे ना ते कारण पुढे करत टाळले.

मुलगी पाहायला गेले अन् लग्नच उरकले; खुदावाडीच्या घोडके शेतकरी कुटुंबाने ठेवला समाजासमोर आदर्श

अणदूर/सचिन तोगी

सध्या सर्वत्र असलेली दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता लग्नकार्यातील लाखो रुपयांची उधळण पट्टी लग्न सोहळ्यातील अवाढव्य खर्चाला फाटा देत, एका शेतकरी तरुणाने समाजासमोर अनोखा आदर्श ठेवला आहे. खुदावाडी (ता. तुळजापूर) येथील किरण मल्हारी घोडके यांनी दिवाळी सणातील पाडव्याच्या शुभ मुहूर्ताची मंगळवार दि. १० नोव्हेंबर रोजी गावातील नवरी मुलगी सुप्रिया रानबा गुड्ड हिला पाहण्यासाठी गेले होते. मात्र, उप-स्थित यावेळी वधू-वराकडील मंडळी, आई-वडील, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांनी घेतलेल्या सकारात्मक निर्णयामुळे थेट लग्नच उरकण्यात आले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर होणारा लाखो रुपयांचा मोठा खर्च टाळून अगदी साधेपणाने विवाह करण्याचा प्रस्ताव यावेळी मांडण्यात आला. नवरदेव व नवरी



मुली दोन्हीकडील कुटुंबीयांनी याला तत्काळ परवानगी देताच, उपस्थित मोजक्या पाहुण्यांच्या साक्षीने हा मंगल सो-हळा अत्यंत साधेपणाने पार पडला.

या स्तुत्य निर्णयाप्रसंगी सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांचे मामा हनुमंत बनसोडे यांच्या पुढाकाराने हा विवाह सोहळा पार पडला. यावेळी अनिल पापडे तसेच खुदावाडीचे महादेव सालगे, तुकाराम बोंगरगे ,राम जवळगे, मनोज कबाडे, गंगाधर चिंचोले, गुंडाप्पा कापसे, गुलचंद्र घोडके, संभाजी घोडके, प्रवीण गुड्डु व गावातील इतरही नागरिक उपस्थित होते.

लग्नातील अनावश्यक खर्च आणि दिखाऊपणा टाळून थेट साधेपणाने विवाह पार पाडत या तरुणाने आणि ग्रामस्थांनी संपूर्ण महाराष्ट्राला एक नवा आदर्श दाखवून दिला आहे. या अनोख्या उपक्रमाचे सर्व गावांमधून आणि तालुक्यातून कौतुक होत आहे.

पान १ वरून....

उपयुक्त साठा

मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्प मिळून ७६७.५३ दशलक्ष घनमीटर क्षमतेपैकी केवळ ८५.२९ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा उरला आहे. दिवसेंदिवस पाणीसाठ्यात होणारी घट पाहता नागरिकांनी पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे.

....

आरणवाडी

संचही जळाले. परिसरातील विद्युत तारा खाली लोंबकळत असल्याने त्यातून ठिणगी पडून ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उभे केलेले ऊसपीक आणि सिंचनासाठी केलेली गुंतवणूक आगीत नष्ट झाली. या घटनेमुळे बाधित शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. महावितरणच्या दुर्लक्षामुळे अशा दुर्घटना घडत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. तसेच तालुक्यातील लोंबकळणाऱ्या विद्युत तारांचे सर्वेक्षण करून तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा अशा घटना पुन्हा घडण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

....

आ.अर्जुनराव खोतकर

भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन प्रस्तावित सुमारे ₹१२४६ कोटी खर्चाच्या स्वतंत्र समांतर पाणीपुरवठा योजनेला तत्त्वत: मान्यता देण्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले. मौजपुरी येथील दौऱ्यादरम्यान खोतकर यांनी केलेल्या आग्रही मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्र्यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जालना तालुक्यातील मौजपुरी येथील रामेश्वरी महादेव संस्थान येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी तसेच त्यांना आनंदाचा शिधा देऊन दिलासा देण्यासाठी आले होते. या दौऱ्यादरम्यान आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांनी जालना शहराच्या वाढत्या पाणीटंचाईचा आणि भविष्यातील पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न उपमुख्यमंत्र्यांसमोर मांडला. जालना शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, विस्तारणाऱ्या नवीन वसाहती, औद्योगिकीकरण आणि भविष्यातील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता शहरासाठी स्वतंत्र समांतर पाणीपुरवठा योजना मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी खोतकर यांनी केली. यावर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन योजनेला तत्त्वत: मान्यता देण्याचे आश्वासन दिले व संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाहीसाठी तातडीने बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिल्याची माहिती खोतकर यांनी दिली.अंबडमार्गे नव्हे, जालन्यासाठी स्वतंत्र समांतर जलवाहिनी या प्रस्तावित योजनेबाबत आमदार अर्जुन खोतकर यांनी एक महत्त्वाची बाब स्पष्ट केली आहे. नवीन समांतर पाणीपुरवठा योजना ही अंबडमार्गे न आणता जालना शहरासाठी स्वतंत्र स्वरूपात राबविण्यात येणार आहे. जालना शहराची सध्याची आणि भविष्यातील पाण्याची गरज विचारात घेऊन स्वतंत्र जलवाहिनी व आवश्यक पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. जालना शहराला दीर्घकाळ पुरेसा, नियमित व शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी स्वतंत्र समांतर योजना कार्यान्वित करणे आवश्यक असून, या संदर्भातील तांत्रिक बाबी आणि अंमलबजावणीचे नियोजन संबंधित विभागांच्या उच्चस्तरीय बैठकीत निश्चित करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे खोतकर यांनी स्पष्ट केले.

मौजपुरीतील मागणीनंतर मंत्रालयीन स्तरावर तातडीने पाठपुरावा

मौजपुरी येथील चर्चेनंतर आमदार अर्जुन खोतकर यांनी दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देऊन त्यांच्या अध्यक्षतेखाली व राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्याची लेखी मागणी केली आहे. या बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे वरिष्ठ सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जालना महानगरपालिकेचे आयुक्त, शहर अभियंता, पाणीपुरवठा अभियंता तसेच वित्त विभाग व संबंधित मंत्रालयीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपस्थित ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रालयीन दालनात लवकरच या विषयावर उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

१२४६ कोटींच्या योजनेत आधुनिक पाणीपुरवठा व्यवस्था

जालना महानगरपालिकेच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या तांत्रिक खर्चपत्रकानुसार सुमारे ₹१२४६ कोटींच्या या योजनेमध्ये स्वतंत्र मुख्य जलवाहिनी, नवीन जलउपसा व्यवस्था, जलशुद्धीकरण प्रकल्प, जलसाठवण टाक्या, अत्याधुनिक पंपिंग यंत्रणा तसेच शहरातील विविध भागांमध्ये विस्तारित जलवितरण व्यवस्था उभारण्याचे नियोजन आहे. या योजनेच्या माध्यमातून शहराच्या सध्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवरील ताण कमी करून भविष्यातील वाढत्या मागणीची पूर्तता करण्याचे उद्दिष्ट आहे. केवळ आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष मंजुरीसाठी अर्जुनभाऊंचा आग्रह असल्याने तत्वत:मान्यता मिळाली आहे. मौजपुरी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रत्यक्ष मागणी मांडल्यानंतर आमदार अर्जुन खोतकर यांनी हा विषय केवळ मौखिक आश्वासनापुरता मर्यादित न ठेवता आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवला आहे. प्रस्तावित योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल, तांत्रिक व्यवहार्यता, प्रशासकीय व वित्तीय मान्यता, संभाव्य अर्थसाहाय्य, निधी उप-लब्धता आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यासाठी उच्चस्तरीय बैठकीत निर्णय घेण्यात यावा, अशी त्यांची मागणी आहे. जालना शहराच्या पाणीप्रश्नावर तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी पुढील अनेक दशकांची गरज भागविणारी भक्कम पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यावर त्यांनी भर दिला आहे.

दुष्काळग्रस्तांच्या दिवाळीत जालन्याच्या भविष्यातील पाणीप्रश्नालाही प्राधान्य

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मौजपुरी येथे आले असताना आमदार अर्जुन खोतकर यांनी ग्रामीण भागातील दुष्काळाच्या प्रश्नांसोबतच जालना शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याचा विषयही प्राधान्याने मांडला. मौजपुरीतील प्रत्यक्ष आग्रही मागणी, उपमुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद आणि त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत उच्चस्तरीय बैठकीसाठी करण्यात आलेला लेखी पाठपुरावा यामुळे जालन्याच्या समांतर पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे. जालना शहराचा वाढता विस्तार, नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता ही योजना प्रत्यक्षात आल्यास शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

....

माजलगाव ग्रामीण पोलीस

प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे म्हणजे परिसरातील अनेक गावांच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेले महत्त्वाचे माजलगाव ग्रामिण पोलीस ठाणे आहे.पात्रूडसह अनेक गावांचा या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात समावेश आहे. मात्र, परिसरात अवैध धंद्यांबाबत तक्रारी होत असतानाही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांतून केला जात आहे.

पात्रूडमध्ये गुटखा तस्करी जोमात!

पात्रूड परिसरात गुटख्याची विक्री आणि तस्करी सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. बंदी असलेल्या गुटख्याची विक्री होत असेल तर संबंधितांवर कठोर कारवाई करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. मात्र, या प्रकारांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. त्यामुळे पात्रूडमधील गुटखा तस्करीला नेमके कोणाचे अभय आहे, असा सवाल उप-स्थित होत आहे.

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत...

ग्रामीण भागात अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पोलिसांची असते. मात्र, काही ठिकाणी अवैध धंद्यांबाबत तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एखादी तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात गेल्यानंतर नागरिकांना योग्य प्रतिसाद मिळतो का, तक्रारींची तातडीने दखल घेतली जाते का, असे प्रश्नही उपस्थित होत आहेत.

अवैध धंद्यांमुळे तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत असून गावागावांत अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्षात अवैध धंदे बंद करण्यासाठी पोलीस प्रशासनाने पुढाकार घेण्याची गरज आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे!

पात्रूड परिसरातील कथित गुटखा तस्करी आणि माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांच्या तक्रारींची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

पात्रुड पोलीस चौकी बनली वसुली केंद्र!

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील पोलीस चौकी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. या चौकीवर दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असताना परिसरात कथितरीत्या मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री आणि मटक्याचे अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे पात्रुड पोलीस चौकी नेमकी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आहे की वसुलीचे केंद्र बनली आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पात्रुड परिसरात गुटख्याची विक्री तसेच मटक्याचे व्यवहार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. या अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्थानिक पोलीस यंत्रणेची असताना अद्याप ठोस कारवाई का दिसत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. चौकीवर दोन पोलीस कर्मचारी तैनात असताना त्यांच्या नियुक्तीचा नेमका उपयोग काय? अवैध धंदे रोखण्यासाठी त्यांची नियुक्ती झाली आहे की केवळ हजेरी आणि वसु-लीसाठी, असा बोचरा सवाल नागरिक विचारत आहेत. पोलीस प्रशासनाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन पात्रुड परिसरातील अवैध गुटखा विक्री आणि मटका व्यवसायाची सखोल चौकशी करावी. संबंधित बीट अंमलदारांच्या कामकाजाची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गुटखा किंग बाबू आणि पात्रुड बीटच्या दोन पोलिसांचे सीडीआर तपासा; दूध का दूध, पाणी का पाणी होईल!

माजलगाव तालुक्यातील पात्रुड परिसरात अवैध गुटखा विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. परिसरात गुटखा किंग म्हणून चर्चेत असलेल्या बाबूच्या कथित व्यवहारांची आणि पात्रुड बीटमध्ये कार्यरत असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची आता सखोल चौकशी होण्याची गरज निर्माण झाली आहे. या प्रकरणात काही संशयास्पद संबंध किंवा संपर्क आहेत का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. पात्रुड परिसरात मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री सुरू असल्याच्या तक्रारी असताना स्थानिक पोलीस यंत्रणा ठोस कारवाई का करत नाही? दोन पोलीस कर्मचारी नियुक्त असतानाही अवैध व्यवसायांना आळा का बसत नाही? या प्रश्नांची उत्तरे आता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी देण्याची गरज आहे. या संपूर्ण प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी गुटखा विक्रीत चर्चेत असलेल्या बाबूचे आणि संबंधित दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) कायदेशीर प्रक्रियेनुसार तपासावेत. त्यांच्या संपर्कांचा, व्यवहारांचा आणि संभाव्य संगनमताचा तपास केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते. अर्थात, केवळ फोन संपर्कावरून दोष सिद्ध होत नाही; त्यासाठी निष्पक्ष चौकशी आवश्यक आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कठोर कारवाई करावी. अवैध धंदे सुरू असताना पोलीस यंत्रणा नेमकी गप्प का? आता चौकशी होणार की प्रकरणाकडे दुर्लक्ष केले जाणार? याकडे संपूर्ण माजलगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

....

सातेलोटे?

शहरातील मुख्य मार्गावरील हॉटेल्स, खाद्यपदार्थांच्या हातगाड्या आणि व्यावसायिक ठिकाणी पुरवठा विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी. वा-परात असलेल्या गॅस सिलिंडरची तपासणी करून ते घरगुती आहेत की व्यावसायिक, याची खातरजमा करावी. गॅस वितरणाच्या नोंदी तपासाव्यात आणि अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. गॅस एजन्सीच्या भूमिकेची चौकशी करा! घरगुती ग्राहकांना सिलिंडर उपलब्ध होत नसताना व्यावसायिक ठिकाणी घरगुती सिलिंडर पोहोचत असतील, तर संबंधित गॅस एजन्सीच्या वितरण व्यवस्थेची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. एजन्सी आणि व्यावसायिक ग्राहकांमधील व्यवहारांची तपासणी करून अनियमितता आढळल्यास संबंधित एजन्सीचा परवाना आणि वितरण अधिकार याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आता पुरवठा विभागाने केवळ कागदी घोडे नाचवू नयेत; प्रत्यक्ष मैदानात उतरून कारवाई करावी. सामान्य ग्राहकांच्या हक्काचा गॅस व्यावसायिक वापरासाठी वळवला जात असल्याचे आढळल्यास संबंधितांना कोणतीही सवलत न देता कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मंठा शहरातील संतप्त गॅस ग्राहकांकडून होत आहे.

....

पाणीप्रश्न सुटणार

जयपाल लाहोटी, रवींद्र (पापाशेठ) गित्ते, बंडू सेठ गरुड, दरक सेठ, कलंत्री सेठ यांच्यासह मोढा मार्केट परिसरातील व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक दिवसांपासून व्यापारी आणि नागरिकांकडून नवीन पाईपलाईनची मागणी केली जात होती. या मागणीची दखल घेऊन पाणीप-ुरवठा विभागाच्या माध्यमातून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाणीपुरवठा विभाग नागरिकांच्या पाणीविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आमदार धनंजय मुंडे, ना. पंकजाताई मुंडे, लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापाशेठ) गित्ते यांच्या पुढाकारातून दुष्काळातही पाणीपुरवठ्याच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. शहरातील विविध भागांतील पाणीपुरवठ्याच्या अडचणी दूर करण्यासाठी विभागाकडून कामे हाती घेतली जात आहेत. दरम्यान, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, नळांना तोट्या बसवाव्यात, पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच पाणीगळती किंवा तांत्रिक अडचण आढळल्यास तातडीने नगर परिषद पाणीपुरवठा विभागाला कळवावे, असे आवाहन सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी केले आहे. नवीन पाईपलाईनच्या कामामुळे मोढा मार्केट परिसरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा असून, या कामाबद्दल नागरिक व व्यापाऱ्यांनी सभापती जयश्रीताई गित्ते यांचे आभार मानले.

शेवटच्या पानावरून...

तणनाशकाचा घाला!

शेतीपैकी दोन एकर क्षेत्रावर इंडस-११ या वाणाच्या सुमारे २० हजार शिमला मिरचीच्या रोपांची लागवड केली होती. लागवडीनंतर अवघ्या दीड महिन्यात योग्य नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर पीक चांगले बहरले होते. मात्र, ८ नोव्हेंबर रोजी अज्ञात व्यक्तीने संपूर्ण प्लॉटवर तणनाशकाची फवारणी केल्याने मिरचीची झाडे वाळू लागली आहेत. डोळ्यादेखत उभे पीक नष्ट होत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. यंदा परिसरात दुष्काळी परिस्थिती गंभीर असून विहिरी आणि बोअरवेलचे पाणी आटले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत पीक जगविण्यासाठी थोरात यांनी विकतचे पाण्याचे टँकर मागवून शेताला पाणी दिले. लागवड, खते, औषधे, मजुरी आणि पाणी यासाठी आतापर्यंत सुमारे अडीच लाख रुपये खर्च करण्यात आले होते. पालेभाज्यांच्या उत्पादनात घट झाल्याने बाजारात दर वाढलेले असताना शिमला मिरचीतून चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, अज्ञात व्यक्तीच्या कृत्यामुळे संपूर्ण हंगामच उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. दुष्काळाशी संघर्ष करून उभे केलेले पीक अशा प्रकारे नष्ट झाल्याने शेतकऱ्याच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. या घटनेची पोलिसांनी तातडीने दखल घेऊन संबंधित व्यक्तीचा शोध घ्यावा, तसेच कृषी व महसूल विभागाने प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

टँकरच्या पाण्यावर जगविलेले पीक एका फवारणीत उद्ध्वस्त!

''माझ्याकडे सहा एकर शेती असून त्यापैकी दोन एकर क्षेत्रावर दीड महिन्यापूर्वी शिमला मिरचीची लागवड केली होती. योग्य नियोजन आणि संगोपनामुळे पीक चांगले बहरले होते. दुष्काळामुळे विहिरी आणि बोअरवेल आटल्याने विकतचे पाण्याचे टँकर आणून पिकाला पाणी दिले. यासाठी मोठा खर्च केला. मात्र, ८ नोव्हेंबर रोजी अज्ञात व्यक्तीने तणनाशकाची फवारणी केल्याने संपूर्ण पीक हातचे गेले आहे. पोलिस प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन दोषी व्यक्तीचा शोध घ्यावा.''

राजकुमार थोरात, पीडित शेतकरी

दहा लाखांहून अधिक उत्पन्नावर पाणी!

दुष्काळी परिस्थितीमुळे पालेभाज्यांच्या उत्पादनात मोठी घट झाली असून बाजारात त्यांच्या दरात वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत दोन एकरांतील शिमला मिरचीच्या पिकातून दहा लाखांहून अधिक रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, तणनाशकाच्या फवारणीमुळे हे अपेक्षित उत्पन्न धोक्यात आले आहे.

....

दबून मृत्यू

दुष्काळाची तीव्रता वाढल्याने ग्रामीण भागातील अनेक तरुणांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ऊसतोडणीच्या कामावर जावे लागत आहे. शिक्षण घेऊन स्वतःचे भविष्य घडविण्याच्या वयात अमोलला आई-वडिलांच्या खांद्याला खांदा लावून कुटुंबाचा गाडा ओढावा लागत होता. मात्र, या दुर्दैवी घटनेने तिडके कुटुंबाचा आधार हिरावला गेला आहे.दुष्काळाचे संकट केवळ शेतीपुरते मर्यादित राहिले नसून, त्याचे गंभीर परिणाम ग्रामीण भागातील रोजगार, कुटुंबांचे स्थलांतर आणि तरुणांच्या भविष्यावरही होत असल्याचे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे. ऊसतोड मजुरांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचा प्रश्नही या निमित्ताने ऐरणीवर आला आहे.अमोलच्या अकाली निधनाने तिडके कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, पिं-परवाडा गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

....

संत सेना महाराज

अध्यक्ष ज्ञानेश्वर वागमारे, अशोकराव सुर्वेशे, बाळासाहेब मस्के यांच्यासह नाभिक समाजातील विविध मान्यवर पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या श्रद्धास्थानाचा विकास आणि प्रलंबित कामांची पूर्तता करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद असून, या निर्णयामुळे संत सेना महाराज मंदिराच्या कामाला नवी दिशा मिळेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

....

उत्तमराव माने

लवकरात लवकर अदा करावीत, अशी मागणी माने यांनी केली. आगामी काळात सिंचन विहिरी, शेततळे, गायगोठे, घरकुल प्रश्न व इतर योजनांची कामे सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही त्यांनी सांगितले. पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्याच्या उद्देशाने जलतारा अभियान प्रभावीपणे राबवावे. तसेच गाळपेरा क्षेत्रात चारा लागवडीला प्राधान्य देऊन दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय पांदण रस्त्यांचे प्रश्न तातडीने सोडवावेत, जलजीवन मिशनची अपूर्ण कामे पूर्ण करावीत आणि घरकुल लाभार्थ्यांची किरकोळ कारणांमुळे होणारी अडवणूक थांबवावी, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी वेळेवर उप-स्थित राहावेत, शेतकरी व नागरिकांची कामे विनाविलंब मार्गी लावावीत, तसेच थेट लाचखोरी व आर्थिक गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी दक्षता घ्यावी, असेही माने यांनी स्पष्ट केले. सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर होत असताना शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळणे आवश्यक आहे. दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना का होत नाहीत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेत संबंधित कामे लवकरात लवकर सुरू करण्याचे तसेच विविध विषय लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

....

आ.सईद खान

धोंडीराम जाधव, अविनाश गोंडे, अॅड. महेश कुंभार, नारायण चांदबोधले, अशोक ढोणे, महादेव सुरवसे, शारदाताई डोईजड, संजीवनी राऊत, राजश्र-ीताई सोळंके, वर्षाताई आगे, राजेश विघ्ने, सलीम अत्तार, सुरेश नवले, माऊली कदम, सुधाकर कुटे, रामेश्वर काशीद, किशोर पाबळे, राहुल बावणे, गौतम त्रिभुवन, रमेश साळवे, सुग्रीव शिंगाडे सुशील हांडे नवनाथ घाटूळ तुळशीराम धरपडे यांसह विविध शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी केले. सूत्रसंचालन धनंजय पापा सोळंके यांनी केले तर आभार अभिजीत कोंबडे यांनी मानले.

....

राजीनामे

प्रवेश करणार आसल्याची जोरदार चर्चा पाथरी शहरात होत आहे. सदर राजीनामा देतांना नगर परिषदेतील कथीत भ्रष्टचार,अनियमित कारभार आणि शहरातील मुलभुत नागरी समस्याकडे होत असलेले दुर्लक्ष या मुद्यावर नाराजी व्यक्त करत नगर सेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब व नगर सेवक पठाण हसीब खान तहजीब खान यांनी राजीनामा दिला आसल्याचे बोल-लेजात आसले तरी या राजीनामे देण्या मागचे वेगळेच कारण आसल्याची उलटसुलट चर्चा होत आहे.

....

सेवा ठप्प

दरात उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, संबंधित कंपनीची देयके प्रलंबित असल्यामुळे ही सेवा बंद पडल्याचे समोर येत आहे. शासन आणि कंपनीतील आर्थिक व्यवहारांचा तिढा सोडविण्यात प्रशासनाला अपयश येत असल्याने त्याची शिक्षा रुग्णांना का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि नागरी आरोग्य केंद्रांमध्ये ही सेवा बंद असल्याने रुग्णांना बाहेरून तपासण्या करून घ्याव्या लागत आहेत. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या नागरिकांना खासगी प्रयोगशाळांच्या खर्चाचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. आरोग्यसेवेतील अशा प्रकारच्या अनिश्चिततेमुळे शासकीय रुग्णालयांवरील सर्वसामान्यांचा विश्वासही डळमळीत होण्याची शक्यता आहे. प्रशासकीय आणि आर्थिक वाद काहीही असला तरी रुग्णांच्या आरोग्याशी तडजोड करणे योग्य नाही. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कंपनीची प्रलंबित देयके अदा करावीत आणि महालॅबची सेवा पूर्ववत सुरू करावी. तसेच सेवा सुरू होईपर्यंत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून रुग्णांची गैरसोय टाळावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अतीक इस्माईल मोमीन, महादेव साखरे यांनी केली आहे. आरोग्य विभागाने केवळ कागदी आदेश न काढता प्रत्यक्ष रुग्णालयांतील परिस्थिती सुधारावी. दहा दिवसांपासून बंद असलेली रक्त तपासणी सेवा तातडीने सुरू करून सर्वसामान्य रुग्णांना दिलासा द्यावा, अन्यथा या प्रशासकीय निष्क्रियतेची जबाबदारी कोण घेणार? असा सवालही उपस्थित होत आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

महाराष्ट्रात प्रथमच राज्यस्तरीय अंध महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जालन्याकडे

भारतीय विश्वचषक विजेत्या अंध महिला क्रिकेटपटूंचा सहभाग

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्रात प्रथमच जालन्यात राज्यस्तरीय अंध महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून, ही स्पर्धा दिनांक १३, १४ व १५ नोव्हेंबर रोजी दानकुवर महिला महाविद्यालय क्रीडांगण येथे पार पडणार आहे. रोटरी जालना सेंट्रल आणि नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाइंड तर्फे या स्पर्धेचे आयोजन होत असून विशेष आकर्षण म्हणजे भारतीय अंध महिला क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केलेल्या आणि विश्वचषक विजेत्या संघातील काही प्रतिभावान खेळाडूंचा सहभाग असणार आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या कर्तृत्वाने देशाचे नाव उज्वल करणाऱ्या या खेळाडूंच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्याची सुवर्ण संधी प्रथमच महाराष्ट्राला आणि त्यात जालना शहराला मिळाली आहे. जालना शहरासाठी ही अभिमानाची बाब असून, या ऐतिहासिक स्पर्धेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन करण्यात येत आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रलचे अध्यक्ष रोटेरियन राम अग्रवाल आणि आयोजन समिती प्रयत्नशील आहेत.

दुचाकी चोरांच्या टोळीचा पर्दाफाश; विधीसंघर्षग्रस्त बालकासह तरुण जेरबंद!

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; जाफ्राबाद व भोकरदनमधील चोरीचे गुन्हे उघड

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सक्रिय झालेल्या स्थानिक गुन्हे शाखेने महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. दुचाकी चोरीच्या प्रकरणात एका विधीसंघर्षग्रस्त बालकासह १८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे जाफ्राबाद आणि भोकरदन पोलीस ठाण्यांत दाखल असलेले मोटारसायकल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

अजय एकनाथ टेकाळे (वय १८, रा. हिंदनगर, जालना) असे ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यासोबत एका विधीसंघर्षग्रस्त बालकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चोरीच्या मोटारसायकलींची खरेदी-विक्री तसेच त्यांच्याशी संबंधित व्यवहारांबाबत पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालना जिल्ह्यात मोटारसायकल चोरी करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना दिल्या होत्या. त्यानुसार ५ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष तपास पथक तयार केले. या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुचाकी चोरीच्या घटनांतील संशयितांचा शोध घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पथक चोरीच्या घटनांबाबत माहिती संकलित करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत अजय एकनाथ टेकाळे याच्याकडे चोरीची शाईन मोटारसायकल असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नवीन मोंढा परिसरातील बकासुर हॉटेल, बायपास रोड येथे सापळा रचून अजय टेकाळे याला ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे असलेल्या शाईन मोटारसायकलबाबत चौकशी केली. तपासादरम्यान ही मोटारसायकल चोरीची असल्याचे त्याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानुसार पोलिसांनी अंदाजे ९० हजार रुपये किमतीची शाईन मोटारसायकल जप्त केली. या मोटारसायकल चोरीप्रकरणी जाफ्राबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

शाईन मोटारसायकलच्या चोरीबाबत अधिक चौकशी केली असता अजय टेकाळे याने सदर मोटारसायकल एका विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून खरेदी केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी दोघांकडे आणखी चोरीच्या मोटारसायकलींबाबत चौकशी केली. या चौकशीत त्यांनी ५० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल काढून दिली. पोलिसांनी तीही जप्त केली. या मोटारसायकल चोरीप्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२६/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. अशा प्रकारे स्थानिक गुन्हे शाखेने दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील मोटारसायकल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणत एकूण १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी जप्त केल्या. पुढील कारवाईसाठी विधीसंघर्षग्रस्त बालक आणि अजय टेकाळे यांना जाफ्राबाद पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि भोकरदन उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, दीपक घुगे, सागर बाविस्कर, धीरज भोसले आणि सोपान क्षीरसागर यांचा सहभाग होता. जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास करून चोरीच्या वाहनांचा शोध घेण्याच्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेने केलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

मराठा आरक्षण आंदोलनातील हुतात्म्यांच्या वारसांना तातडीने शासकीय सेवेत सामावून घ्या : अरविंद देशमुख

मराठा महासंघाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे

जालना । प्रतिनिधी



मराठा आरक्षणाच्या आंदोलनात बलिदान दिलेल्या ३०९ आंदोलकांच्या वारसांना शासकीय सेवेत नोकरी देण्याच्या आश्वासनाची शासनाने तात्काळ पूर्तता करावी, असे साकडे मराठा महासंघाच्यावतीने जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घातले.

शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी सोमवार दि. ९ नोव्हेंबर रोजी जालना दौऱ्यावर आलेले उपमुख्यमंत्री शिंदे यांची सायंकाळी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडूळ, प्रा. संतोष संतोष कऱ्हाळे, प्रभाकर केदारे. इंजि. शुभम टेकाळे, सुदर्शन देशमुख यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. याप्रसंगी युवा सेनेचे राज्य सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उपस्थिती होती. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०१६ पासून राज्यभरात झालेल्या मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान समाजातील ३०९ बांधवांनी आपले प्राण पणाला लावून बलिदान दिले. या हुतात्मा आंदोलकांच्या कुटुंबीयांना शासकीय अथवा निमशासकीय महामंडळात नोकरी देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. मात्र, प्रत्यक्षात या आश्वासनाची पूर्तता न होता केवळ ३० वारसांना एसटी महामंडळात नियुक्ती देण्यात आली असून, उर्वरित २७९ वारस अजूनही नोकरीच्या प्रतीक्षेत न्यायासाठी दारोदार भटकत आहेत.

एमआयडीसी, महापारेषण तसेच महानिर्मिती यांसारख्या सक्षम महामंडळांमध्ये या वारसांना सामावून घेण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. तरीही अनुकंपा तत्त्वावरील प्रलंबित याद्यांचे कारण पुढे करून महामंडळांकडून जागा उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच एसटी महामंडळात केवळ चालक आणि वाहक अशा मर्यादित पदांच्याच संधी असल्याने अनेक सुशिक्षित वारसांवर अन्याय होत आहे. प्रतीक्षेत असलेल्या सर्व २७९ वारसांना विशेष बाब म्हणून एमआयडीसी, महापारेषण, महावितरण किंवा इतर शासकीय विभागांत त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे. यासाठी मंत्रालयीन स्तरावर तात्काळ विशेष बैठक बोलावून कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, महामंडळांच्या लालफितीच्या कारभाराला चाप लावून वारसांना विनाविलंब नियुक्तीपत्रे वितरित करावीत,घरातील कर्ता माणूस गमावलेल्या या कुटुंबांच्या कायमस्वरूपी उपजीविकेसाठी शासकीय नोकरी हाच खरा आधार असून, मराठा समाजाच्या भावनांचा उद्रेक होण्यापूर्वी शासनाने यावर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

जिल्ह्यातील कालव्यांमधून अनधिकृत पाणी उपसा व हस्तक्षेप रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश

जालना । प्रतिनिधी

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये जालना जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या मुख्य कालव्यासह शाखा कालवे व वितरिकांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा, कालव्यांच्या संरचनेचे नुकसान आणि सिंचन व्यवस्थेतील अडथळे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी यांनी ६ नोव्हेंबर २०२६ रोजी हे आदेश निर्गमित केले आहेत.

जायकवाडी प्रकल्पाच्या मुख्य डावा कालवा (झडइउ) तसेच त्याअंतर्गत मुख्य कालवे, शाखा कालवे, वितरिका व लघुवितरिकांमधून सन २०२६-२७ या हंगामात नियोजित पाणीपुरवठ्यानुसार १० नोव्हेंबर २०२६ पासून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येणार आहे. या सिंचन व्यवस्थेचा लाभ जालना जिल्ह्यातील संबंधित गावांमधील शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे मंजूर पाणीवाटपानुसार शेवटच्या लाभधारक शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे आवश्यक आहे.

मात्र, कालव्यांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा करणे, कालव्यांच्या नियंत्रण संरचनांमध्ये छेडछाड करणे, कालव्यांचे दरवाजे उघडणे किंवा बंद करणे, कालव्यांना भगदाड पाडणे, भरावाचे नुकसान करणे तसेच पाण्याचा प्रवाह अडविणे अशा प्रकारांमुळे सिंचन व्यवस्थेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि सिंचनाचे नियोजन सुरळीत ठेवण्यासाठी हे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

या आदेशानुसार कालव्यांच्या लाभक्षेत्रातील संबंधित गावांमध्ये २४ तास प्रतिबंधात्मक निर्बंध लागू राहणार आहेत. अधिकृत परवानगीशिवाय कालव्यांचे दरवाजे उघडणे अथवा बंद करणे, पाणी वळविणे, सिंचन व्यवस्थेतील शासकीय कामात अडथळा निर्माण करणे तसेच देखभाल करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामात हस्तक्षेप करणे यास मनाई करण्यात आली आहे.

आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस अधीक्षक जालना व संबंधित पोलीस विभागावर सोपविण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध संबंधित विभागामार्फत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. तसेच आदेशाची प्रसिद्धी संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस स्टेशन आणि पाटबंधारे विभागाच्या कार्यालयांमार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना नियोजित पद्धतीने आणि समान न्यायाने सिंचनाचे पाणी उपलब्ध व्हावे, तसेच कालवा व्यवस्थेचे नुकसान टाळावे, या उद्देशाने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

दुष्काळग्रस्त मराठवाड्यात शिवसेनेतर्फे साजरी झाली 'दिवाळी'; उपमुख्यमंत्री शिंदे यांची जालना दौऱ्यात शेतकऱ्यांशी संवाद साधत दिलासा

जालना । प्रतिनिधी



राज्यभरात एका बाजूला दुष्काळी परिस्थिती असताना, मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी आणि त्यांच्यासोबत असल्याची भावना कृतीतून दाखवण्यासाठी शिवसेनेच्या वतीने जालना जिल्ह्यातील भिलपुरी गावात अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी करण्यात आली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी स्वतः भिलपुरी येथे भेट देत दुष्काळग्रस्त कुटुंबांसोबत दिवाळी साजरी केली.

या दौऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भिलपुरी येथील बांगडे कुटुंबीय आणि अंबादास किसनराव तांगडे यांच्या घरी सहकुटुंब दुपारचे भोजन घेतले. या संवेदनशील उपक्रमामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा मानसिक दिलासा मिळाला असून, शेतकऱ्यांनीही त्यांचे उत्साहात स्वागत केले. या दौऱ्यात उपमुख्यमंत्र्यांसोबत जालना जिल्ह्याचे आमदार अर्जुनराव खोतकर, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, शिवसेनेचे वरिष्ठ नेते आनंद परांजपे यांच्यासह पक्षाची संपूर्ण टीम मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी उपस्थित होती.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या व निवेदने

दौऱ्यादरम्यान स्थानिक शेतकऱ्यांनी दुष्काळग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी व इतर शेतमजुरीची कामे तत्काळ सुरू करण्याची मागणी केली. तसेच, विविध संस्थांच्या वतीने नेत्यांना निवेदने देण्यात आली. महाराष्ट्र लोकविकास मंच व स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियान: संचालक मिलिंद सावंत यांनी मराठवाड्यात 'मुख्यमंत्री पशुधन योजना' आणि 'विकसित भारत रोजगार हमी कार्यक्रम' प्रभावीपणे राबविण्याची मागणी केली. विविध संघटना व प्रतिनिधी: युवाशक्ती सेवाभावी संस्थेचे अमोल खरात, बाबासाहेब आंबेडकर संस्थेचे प्राध्यापक गरुड, शाहीर दीपक हिवाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश गोरे, सरपंच राजेश जराड, सुरेश खंडाळे यांच्यासह रामनगर परिसरातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाचे आश्वासन

मराठवाडा व विदर्भात दुष्काळ निर्मूलनाची प्रभावी कार्ये करण्यासाठी शासनाकडेमुबलक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन या वेळी देण्यात आले. अर्जुनराव खोतकर यांच्यासह पक्षाचे सर्व सहकारी दुष्काळ निर्मूलनासाठी कटिबद्ध असून शासन सर्वतोपरी मदत करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नेत्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थित शेतकऱ्यांनी व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत संपादित जमिनीवरील खोदकाम थांबवा!

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबेवडगाव येथील गट क्रमांक ८० मधील संपादित जमिनीवर सुरू असलेले खोदकाम व इतर कामकाज तात्काळ थांबविण्यात यावे, अशी मागणी शेतकरी अशोक भाऊराव खरात यांनी मंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत संबंधित जमिनीवर कोणतेही खोदकाम करू देऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

लिंबेवडगाव शिवारातील गट क्रमांक ८० मधील शेतजमीन पाटोदा साठवण तलावासाठी संपादित करण्यात आली आहे. मात्र, संपादन प्रक्रियेनंतर शेतकऱ्यांना शासनाकडून केवळ प्रमाणित रक्कम मिळाली असून, अंतिम मोबदल्याबाबत वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी न्याय मिळण्यासाठी न्यायालयात दावा दाखल केला आहे. दरम्यान, समृद्धी महामार्गाच्या कामाचे कंत्राट घेतलेल्या कंपनीशी संबंधित काही लोकांकडून शेतकऱ्यांची पूर्वपरवानगी किंवा पूर्वसूचना न घेता संपादित क्षेत्रातील मुरूम, दगड व माती खोदून नेली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

याबाबत संबंधितांना विनंती केली असता, कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना शिवीगाळ करून कामात अडथळा आणल्यास पोलिसांत गुन्हे दाखल करण्याची धमकी दिल्याचेही निवेदनात म्हटले आहे. संपादित जमिनीच्या मोबदल्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असताना संबंधित कंपनीकडून शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप अशोक खरात यांनी केला आहे. न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत संबंधित जमिनीवरील खोदकाम व इतर कामकाज थांबवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा आणि संबंधित कंपनीविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी पोलीस निरीक्षकांकडे ८ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

कष्टकऱ्यांच्या आनंदात सहभागी होणे, हीच दिवाळीची गोडी : भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या पदाधिकाऱ्यांनी (दि.०७) रोजी मौजे बठान बु. ता.जालना येथे ऊसतोड कामगारांसोबत पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्ताने परिसरातील कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा देत भेटवस्तू तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कामगारांशी संवाद साधला. समाजातील कष्टकरी आणि श्रमिक घटक हा आपल्या सामाजिक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त केली.

यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की, कष्टावर अनेकांचे जीवनमान अवलंबून आहे. दिवाळी हा आनंद, आपुलकी आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. कुटुंबापासून दूर राहून कष्ट करणाऱ्या या कामगारांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेता यावा, त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात व गरजूंच्या मदतीसाठी तत्पर राहणे हेच आपल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे, असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, गटनेते महेश निकम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, सरपंच ज्ञानेश्वर देवडे, दत्तू नाना बागल, नानासाहेब देवडे, बळीराम शिंदे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, राजाराम जाधव, गजानन खरात, विष्णू डोंगरे, कृष्णा गायके, शिवाजी गवारे, मदन गवारे, डॉ. राहुल मोरे, नागेश अंभोरे, दिगांबर गोल्डे, कुंडलिक जिजा देवडे, दिगंबर गोल्डे, उद्धव ढवळे, विष्णू ढगे, सागर वाहूळकर, सुधाकर शिंदेगणेश बागल, कडूबा जिजा देवडे, विठ्ठल बागल, सचिन बागल, सिद्धेश्वर देवडे, विनोद बागल, गजेंद्र बागल, गणेश देवडे, विश्वंभर देवडे, वैभव देवडे, प्रशांत उबाळे, परमेश्वर देवडे, चैतन्य देवडे, राजू देवडे, रामनाथ देवडे, नवनाथ सिरसाठ, भाऊसाहेब गोल्डे, रवी जगधने, बाबुराव बागल, सुभाष बागल यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अॅड. महेश धन्नावत व श्लोक अग्रवाल यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट

जालना । प्रतिनिधी

दिवाळीनिमित्त प्रसिद्ध विधिज्ञ अॅड. महेश धन्नावत आणि श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची गुरुवार दि.१२ नोव्हेंबर रोजी वडीगोद्री (ता. अंबड) येथे सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी जरांगे पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक शक्ती लाभावी, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

याप्रसंगी अॅड. महेश धन्नावत म्हणाले की, आज शेतकरी, शेतमजूर आणि गरीब कुटुंबे आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा कठीण परिस्थितीत जनतेच्या प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना अधिक बळ मिळणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांना शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी आपले सर्वोत्तम योगदान देता यावे, हीच आमची ईश्वरचरणी प्रार्थना आहे. दिवाळीचा खरा आनंद स्वतःचे घर उजळविण्यात नसून गरजूंच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आहे. श्लोक अग्रवाल म्हणाले की, दिवाळी हा माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा सण आहे. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व गरजू कुटुंबांच्या पाठीशी समाजाने उभे राहिले पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांना उत्तम आरोग्य आणि अधिक शक्ती लाभो, जेणेकरून ते शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्य करू शकतील. समाजातील शेवटच्या गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य फुलले, तर तीच खरी दिवाळी ठरेल. दिवाळीच्या निमित्ताने झालेल्या या सदिच्छा भेटीतून सामाजिक एकोपा, परस्पर आदर आणि शेतकरी व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याचा संदेश देण्यात आला.

लोकसंख्या कमी असतानाही देशाच्या जीडीपीमध्ये मारवाडी समाजाचे मोठे योगदान : कैलास गोरंट्याल

जालना । प्रतिनिधी

देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत मारवाडी समाजाची लोकसंख्या कमी असली, तरी देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) या समाजाचे मोठे योगदान आहे. व्यापार-उद्योगासोबतच सामाजिक कार्यातही मारवाडी समाज नेहमीच अग्रेसर राहिला असून, संकटकाळात समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्याची परंपरा या समाजाने जपली आहे, असे गौरवोद्गार माजी आमदार तथा भाजप नेते कैलास गोरंट्याल यांनी काढले.

अखिल भारतीय मारवाडी संमेलनाच्या जालना शाखेतील मारवाडी युवा मंच व मारवाडी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने सोमवारी (दि. ९) रुक्मिणी गार्डन येथे आयोजित सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमात ते बोलत होते. अखिल भारतीय जैन श्वेतांबर सोशल ग्रुप फेडरेशनचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष गौतमसिंह मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. जुगलकिशोर भाला यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे, उद्योजक घनश्यामदास गोयल, माजी आमदार संतोष सांबरे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच जेपीसी बँकेचे अध्यक्ष सतीश पंच, जनसेवा ग्रुपचे उपाध्यक्ष नरेश गुप्ता, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र पहाडे, नगरसेवक महावीर ढक्का, मनोज जोशी, ललित विजावत, मारवाडी संमेलनाचे प्रदेश महामंत्री सुदेश करवा, प्रदेश उपाध्यक्ष उमेश पंचारिया, शिवलाल राठी आदींची उपस्थिती होती.

गोरंट्याल पुढे म्हणाले की, देशाची लोकसंख्या सुमारे १४० कोटी असून, त्यामध्ये मारवाडी भाषा बोलणाऱ्या विविध समाजघटकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मारवाडी समाजाने व्यापार-उद्योगाच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी दिली असून, नैसर्गिक आपत्ती आणि संकटाच्या काळातही सामाजिक बांधिलकी जपत मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. जालना शहरातील मारवाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावून रामतीर्थ स्मशानभूमीच्या धर्तीवर तिचा विकास करण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजपचे जिल्हा महानगराध्यक्ष भास्कर दानवे म्हणाले की, समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम मारवाडी समाज सातत्याने करीत आहे. सामाजिक समरसतेचा संदेश देणारा सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलनाचा उपक्रम मराठवाड्यातील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटक डॉ. जुगलकिशोर भाला यांनी देशाच्या विकासात मारवाडी समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत, समाजबांधवांनी संघटित होऊन सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. दीपावली स्नेहमिलनासारख्या उपक्रमांतून सामाजिक एकतेचा आणि समतेचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना गौतमसिंह मुनोत म्हणाले की, प्रामाणिकपणे व्यवसाय करून देशाच्या विकासात योगदान देणारा मारवाडी समाज सामाजिक बांधिलकीही जपतो. भूकंप, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात समाजाने मोठ्या प्रमाणात मदतकार्य करून आपले सामाजिक भान सिद्ध केले आहे. समाजाच्या अधिक प्रगतीसाठी सर्वांनी संघटित होण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात नगरसेवक विरेंद्रप्रकाश धोका यांनी मारवाडी समाजाच्या देशाच्या विकासातील योगदानाचा आढावा घेतला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानासंदर्भातील न्यायालयीन लढा जिंकून महानगरपालिकेची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. शब्बीर अली उद्यानाची जागाही न्यायालयीन लढ्याद्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शहरातील मारवाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची गरज व्यक्त केली.

आरोग्य सेवा अधिक सक्षम करून, गुणवत्तापूर्ण द्याव्यात : आयुक्त संजय काटकर



जालना । प्रतिनिधी

वैद्यकीय सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांनी दिले. वरिष्ठ स्तरावरून मिळालेले मार्गदर्शन निश्चित प्रेरणादायी ठरणार असल्याचे उपसंचालक डॉ. कांचन वानेरे यांनी स्पष्ट केले. आयुक्त सार्वजनिक आरोग्य विभाग संजय काटकर व उपसंचालक डॉ. कांचन वानेरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र आष्टी येथे भेट देऊन आरोग्य विभागाच्या विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी आरोग्य संस्थेतील विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी, उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ व इतर प्रशासकीय बाबींची पाहणी करण्यात आली. तसेच आरोग्य संस्थांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्याम राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. गोळेगावकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक रावसाहेब शेळके, सर्व समुदाय आरोग्य अधिकारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



ऐतिहासिक अष्टकोनी हत्ती तलावावर १००१ दिव्यांनी उजळला 'पहिला बळीराजा दीपोत्सव २०२६'!

पानगाव येथे दीपोत्सवाचा भव्य सोहळा; प्रा. विक्रम कदम यांचे इतिहास व तरुणांसाठीच्या आदर्शांवर मार्गदर्शन

पानगाव । प्रतिनिधी

दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त पानगाव येथील सुमारे ३०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या अष्टकोनी हत्ती तलावावर 'पहिला बळीराजा दीपोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. दि.१० नोव्हेंबर रोजी आयोजित या दीपोत्सवामुळे ऐतिहासिक हत्ती तलाव परिसर १००१ दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला. या नेत्रदीपक सोहळ्याने ग्रामस्थांसह उपस्थितांची मने जिंकली.

पानगाव हे ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव असून गावात सुमारे ३०० वर्षे पुरातन आणि दोन एकर क्षेत्रफळावर विस्तारलेला अष्टकोनी हत्ती तलाव, हेमाडपंती मंदिरे तसेच अनेक पुरातन वास्तू आजही इतिहासाची साक्ष देत उभ्या आहेत. दीपावलीच्या निमित्ताने अशा ऐतिहासिक वास्तूंना भेट देऊन दीपोत्सव साजरा करण्याची परंपरा व मान्यता आहे. याच ऐतिहासिक वारशाचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीला त्याची ओळख व्हावी, या उद्देशाने यावर्षी पहिल्या बळीराजा दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. विक्रम कदम (सातारा) यांनी '१० नोव्हेंबर शिवप्रताप दिन, इतिहासकालीन पानगाव आणि तरुणांसाठीचे आजचे आदर्श तुकाराम मुंडे साहेब' या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देत तरुणांनी इतिहासातून प्रेरणा घ्यावी, आदर्श व्यक्तिमत्त्वांचे विचार आत्मसात करावेत आणि सामाजिक बांधिलकी जपावी, असे विचार मांडले.



कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ऐतिहासिक अष्टकोनी हत्ती तलावाच्या काठावर तब्बल १००१ दिव्यांचे प्रज्वलन करण्यात आले. यावेळी करण्यात आलेल्या नेत्रदीपक फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला. दिव्यांच्या लखलखाटात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पहिल्या बळीराजा दीपोत्सवाची सांगता झाली. या भव्य दीपोत्सवाचे आयोजन स्वराज्याचे ५ वे छत्रपती रामराजे महाराज प्रतिष्ठान, पानगाव व सर्व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत उद्योजक गणेश पाटील यांनी केले, तर विनोद काळे यांनी प्रास्ताविकातून दीपोत्सव आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

सदर दीपोत्सव सोहळ्यास माजी सनदी अधिकारी व रंगकर्मी श्री दिपक नलावडे, माजी पोलिस उप अधीक्षक, श्री बापूसाहेब काळे, प्राचार्य श्री कसबे सर, जि प सदस्य, कुमार काळे, सरपंच अंकुश मोरे, उपसरपंच रोहिणी जमदाडे, माजी जि प सदस्य जयसिंगराव देशमुख, माजी सरपंच दयानंद गाडे, उद्योजक श्री बाबासाहेब कापसे, पो. नि. दयानंद पाटील, प्रकाश कानगुडे, संतोष मोरे, तेजसिंह देशमुख, जयराज देशमुख, दीपक खंदारे, पिंटू नाईकवाडी, गणेश पाटील, महेंद्रजी नाईकनिंबाळकर वैराग, रुबाब प्रतिष्ठानच्या भाग्यश्री ताई मोरे, जस्मिन शेख, लक्ष्मी वलगुडे, शितल घोडे, मनीषा काळे, युवराज काळे, महादेव पाटील, ग्रा. प सदस्य प्रकाश कानगुडे, विनोद (काका) काळे, विजयसिंह देशमुख, मिट्टू तिकांडे, संतोष कानगुडे, पिनू मोरे, अतुल जगदाळे, गणेश खंदारे, अकबर सय्यद, दशरथ चव्हाण, आण्णा कानगुडे, खंडू चव्हाण, उदय पाटील, दयानंद चव्हाण, सुनिल जमदाडे, श्रीमंत दर्याबाईसाहेब नाईक निंबाळकर स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र, माजी सैनिक संघटना, रुबाब महिला प्रतिष्ठान, विविध महिला बचत गटांच्या सदस्या, समस्थ पेठकरी मंडळी, स्वस्तिक असोसिएट्स चे सर्व सदस्य सहकुटुंब, नितीन झाडे, कमलाकर जगताप, हरिदास काळे, मदनसिंह पाटील, प्रमोद गाडे, गणेश पाटील, सचिन कापसे, प्रदीप पवार, संतोष भुसारे, उमेश काळे, मिट्टू घोडके, जयवंत घोडे, संत तुकाराम विद्यालय येथील विद्यार्थी व शिक्षक वृंद व पानगांव मधील तसेच सर्व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऐतिहासिक वारशाचे जतन, सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण करणारा हा पहिला बळीराजा दीपोत्सव पानगावच्या सांस्कृतिक वैभवात मानाचा तुरा ठरला.

पिक विमा कंपनीचा नवा फतवा; आधार बायोमेट्रिक पद्धतीवर शेतकऱ्यांचा आक्षेप!

जुन्याच पद्धतीने पीक विमा भरण्याचे निकष ठेवावेत; बायोमेट्रिकच्या अटीमुळे शेतकऱ्यांत गैरसोईची भावना

औसा । बी.डी. उबाळे

सध्या शेतकरी वर्गावर मोठे टंचाई आणि दुष्काळाचे सावट घोंगावत असतानाच पिक विमा कंपनीने नवीनच फतवा काढल्याने या फतव्याबाबत शेतकऱ्यात मोठया नाराजीचा दिसून येत आहे. २०२६ रब्बी हंगामातील पीक विमा भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, यावर्षी पीक विमा भरण्यासाठी आधार बायोमेट्रिक व्हेरिफिकेशनची अट घालण्यात आली आहे. मात्र, पीक विमा कंपनीच्या या नव्या धोरणामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे पीक विमा भरण्याची जुनी पद्धतच कायम ठेवावी अशी



मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

शेतकऱ्यांना पीक विमा भरताना आधार कार्ड, सातबारा, आठ-अ, पीक पेरा नोंद व बँक पासबुक आदी कागदपत्रे सादर करावी लागत आहेत. पुर्वी आधार ओटीपी च्या सहाय्याने ओटीपी घेऊन पिक विमा भरला जात होता परंतु आता आधार बायोमेट्रिक व्हेरिफिकेशनसाठी प्रत्यक्ष शेतकऱ्याची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. अनेक शेतकरी शेतीच्या कामासाठी शेतात असतात, तर काही शेतकऱ्यांचे वय अधिक असल्याने किंवा बोटांचे ठसे जुळत नाहीत, काही शेतकरी कामांच्या निमित्ताने बाहेर गावी असतात त्यामुळे बायोमेट्रिक प्रक्रियेत अडचणी निर्माण होणार असून लाखो शेतकरी पिक विमा योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे शासनाने यात तात्काळ लक्ष वेधून आधार बायोमेट्रिक ही जाचक अट बंद केली तरच या योजनेचा लाभ सर्वसामान्य शेतकरी यांना मिळण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाच्या सुधारित भुमिकेकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

ब्रम्हाकुमारी दीदी समाजाला दिशा देण्याचे काम करतात : सहकारमंत्री पाटील

चाकूर । प्रतिनिधी

ब्रह्मकुमारी दीदी या समाजाला दिशा देण्याचे काम करत असतात, ब्रह्मकुमारी दीदीच्या कार्य महान असून आजच्या परिस्थितीत समाजाला ज्या भवनांची आवश्यकता आहे दिव्य दर्शन भवन ब्रह्मकुमारी दीदींच्या माध्यमातून उभा राहते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले. ते चाकूर येथे ब्रह्मकुमारी संघटनेच्य वतीने दिव्य दर्शन भवनाचा उद्घाटन समारंभ ब्रह्मकुमारी जयंती दीदी (सहमुख्य प्रशासक ब्रह्माकुमारीज) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील होते. यावेळी ते



बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर, खा.डॉ. शिवाजीराव काळगे, डॉक्टर चंद्रप्रकाश नागिमे (चेअरमन खरेदी विक्री संघ चाकूर), राजेंद्र मायने (उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर), पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, नगराध्यक्ष भागवत फुले, माजी उपनगराध्यक्ष विलासराव पाटील चाकूरकर, मोहनराव पाटील चाकूरकर, राजयोगिनी ब्रम्हाकुमारी हंसा दीदी, राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सोमप्रभा दीदी, राजयोगिनी ब्रम्हाकुमार रुपेश भाई, राजयोगिनी ब्रम्हाकुमार भरत भाई, राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सुनीता बहन, राजयोगिनी ब्रम्हाकुमारी प्रतिमा दीदी, राजयोगिनी ब्रम्हाकुमारी संगीता बहन राजयोगिनी ब्रम्हाकुमारी नंदा बहन, आयोजक ब्रह्माकुमारी महानंदा दीदी, ज्योती बहन व चाकूर शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते.

दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विविध ब्रम्हा कुमारी बंधू आणि भगिनींनी या ठिकाणी मार्गदर्शन केले. यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, आज दुष्काळ सारखी परिस्थिती आपल्या मराठवाड्यात, महाराष्ट्रत असताना यातून सुद्धा एक शांतीचा संदेश देण्यासाठी व समाजाला शिकवण देण्यासाठी या भवनांची निर्मिती करण्यात येत असून देवाची भक्ती ही अंतकरणापासून केली पाहिजे ब्रह्मकुमारी या सुद्धा अशाच पद्धतीने भक्ती करत असतात. त्याचबरोबर जगाला विविध संदेश देण्याचं काम यांच्या संघटनेच्या माध्यमातून होत असते. भवनाच्या माध्यमातून चाकूर शहरातील अनेक नागरिकांमध्ये व अनेक घटकांमध्ये परिवर्तन व्हावी या भवनासाठी शासन म्हणून जी काही आवश्यक्य मदत लागेल ती देण्याची ग्वाही सुद्धा महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली. यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, विलासराव पाटील चाकूरकर, डॉक्टर चंद्रप्रकाश नागिमे यांनीही मनोगतातून या भवनाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास चाकूर शहरातील विविध नागरिकांची व जिल्हाभरातून विविध ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

खानापूर पाटी ते भोकरंबा रस्त्याची दयनीय अवस्था; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, नागरिकांच्या जीवाशी खेळ!

रेनापुर । प्रतिनिधी



रेनापूर तालुक्यातील खानापूर पाटी ते भोकरंबा या महत्त्वाच्या रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना आणि वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एका बाजूला माजी आमदार त्र्यंबक नाना भिसे आणि दुसऱ्या बाजूला विद्यमान आमदार रमेश आप्पा कराड यांसारखे मोठे लोकप्रतिनिधी असतानाही या रस्त्याकडे झालेले दुर्लक्ष दुर्दैवी असून, प्रशासनाकडून नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळला जात असल्याचा घणाघाती आरोप शिवसेना तालुकाप्रमुख कोंडीराम काळे यांनी केला आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्याची दैना उडाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून पावसाळ्यात किंवा रात्रीच्या वेळी प्रवास करताना अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावरून दररोज शेतकरी, शालेय विद्यार्थी, कामगार आणि ग्रामस्थांची मोठी ये-जा असते. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनधारकांचे अतोनात नुकसान होत असून नागरिकांना शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने पाहून संबंधित विभागाने रस्त्याचे डांबरीकरण व दुरुस्तीचे काम तातडीने हाती घ्यावे, अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही कोंडीराम काळे यांनी दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे तात्काळ लक्ष देऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी आता परिसरातून केली जात आहे.

अतनूरचे सरपंच चंद्रशेखर पाटील यांना 'संविधान सन्मान पदवी' जाहीर

उदगीर । पाटील मनेश

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून जनहित फाउंडेशन व मैत्री संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील परळ येथे एका भव्य आणि प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परळ येथील ऐतिहासिक निवासस्थानी बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठीक ५:३० वाजता 'भारताचे संविधान: संविधान गौरव दिन व संविधान सन्मान पदवी २०२६' हा विशेष उपक्रम आणि भव्य सोहळा संपन्न होणार आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात येणार असून, लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील अतनूर गावचे तरुण, तडफदार आणि सर्वसमावेशक युवा सरपंच चंद्रशेखर अशोकराव पाटील यांना या वर्षाचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'संविधान सन्मान पदवी २०२६' हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. निवड समितीने अधिकृतपणे त्यांच्या नावाची घोषणा केली आहे. असे निवड समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज भोईर यांनी कळविले आहे.

'गुरुजी ते सरपंच' असा यशस्वी लोकप्रवास

चंद्रशेखर अशोकराव पाटील यांनी 'गुरुजी ते सरपंच' असा अत्यंत प्रेरणादायी प्रवास केला आहे. अतनूर गावाची धुरा हाती घेतल्यानंतर त्यांनी राजकारणापलीकडे जाऊन '१८ पगड जाती-धर्मातील' सर्व घटकांना सोबत घेऊन गावच्या विकासाची नवी पहाट आणली. गावातील चौका चौकात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महात्मा बसवेश्वर आदींसह अनेक राष्ट्रीय महापुरुषांचे पुर्णाकृती पुतळे स्वखर्चाने बसवून दिले आहेत. या सर्वच महापुरूषांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात धावून जाणारे, पारदर्शक कारभार करणारे आणि तरुणांचे आयकॉन म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण



केली आहे. त्यांच्या याच निस्पृह सेवेची आणि उल्लेखनीय लोककार्याची दखल घेत राज्यस्तरीय निवड समितीने या मानाच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे. एका ग्रामीण भागातील, तिरू नदीच्या खोऱ्यातील आणि घाळेप्पा स्वामींच्या आशीर्वादाने पावन झालेल्या मातीतील सुपुत्राचा थेट मुंबईतील ऐतिहासिक वास्तूत सन्मान होणार असल्याने संपूर्ण अतनूर गावासह परिसर आणि तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या ऐतिहासिक कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक व अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू, प्रसिद्ध राज्यशास्त्र व संविधान अभ्यासक प्रा. अक्षय आंबेडकर उपस्थित राहणार असून, त्यांच्या हस्ते चंद्रशेखर पाटील यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच यावेळी विशेष देखाव्याचे सादरीकरण व मार्गदर्शन होणार आहे. तसेच माजी आमदार बाबुरावजी माने, पत्रकार व संविधान प्रचारक अभ्यासक अमोल स. भा. मडामे आणि प्रसिद्ध कवयित्री व लेखिका शारदाताई नवले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार मुकुंद कांबळे हे या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आहेत. हा कार्यक्रम सोहळा संविधान स्तंभ, बी.आय.टी. चाळ क्रमांक ९, दामोदर हॉल शेजारील गल्ली, विठ्ठल चव्हाण मार्ग, परळ (पूर्व), मुंबई - ४०००१२. होणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून मोहन जाधव, ड. सोपान बुडबाडकर, डॉ. प्रभाकर कांबळे, मीनाक्षी अहिरे, श्याम जाधव, डॉ. संतोष कांबळे, ड.आदिती गायकवाड, विनायक जवळेकर, संतोष खरटमोल, निशा जाधव, दिलीप कांबळे, मनीषा मांदरे, सुवर्णा बामणे, विजय केदासे, अमेय भोसले, वैशाली कांबळे, डॉ. भरत खांडेकर आणि गिरीश शहा हे काम पाहत असून, सर्व नागरिकांनी, भीमसैनिकांनी आणि संविधान प्रेमींनी या ऐतिहासिक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

दगड चिखल मातीने रस्ता व्यापला; शासन प्रतिनिधी खुशाल झोपला

एकाच रात्रीत विना परवाना अनेक ब्रास गौण खनिज मुरूम उपसा

औसा । प्रतिनिधी

तालुक्यातील भादा येथे राष्ट्रीय संपत्ती गौण खनिज मुरूम असणारे एकाच रात्री मध्ये बुधवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री शेकडो ब्रास मुरूम उपसा करून रात्रीच्याच वेळी या भागातील काही मुरूम माफिया करीत असून रात्रीच्या वेळी ते रस्त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असून परवाना की विनापरवाना मुरूम उपसा केला जातोय परंतु या बाबीकडे असणारे स्थानिक शासनाचे प्रतिनिधी मात्र गाढ झोप येत आहेत काय? आणि पोलीस प्रशासनही यांना अभय का देतेय का?हा एक संशोधनाचा विषय असल्याची चर्चा सध्या भादा गावामध्ये जोरदार सुरू आहे.



भादा गावाच्या पूर्वेस असणाऱ्या पाझर तलावा मधील मुरूम आणि या तलावामध्ये आणि त्याच रस्त्यावर जल जीवन मिशनचे हजारो नाहीतर लाखो लिटर पाणी वाया गेले आणि त्या चिखलामधूनच हे ट्रॅक्टर मुरूम उपसा करीत असल्याने राज्यमार्ग क्रमांक २३९ वर जवळपास एक किलोमीटर अंतरापर्यंत चिखल मुरूम दगड, माती पडल्याने पहाटेच्या वेळी फिरण्यासाठी जाणारे जेष्ठ नागरिक आणि विविध भरती प्रक्रियेशी निगडित असलेले विद्यार्थी मैदानी स्पर्धेसाठी सकाळी व्यायाम, रनिंग साठी जातात. यामुळे या रस्त्यावर पडलेली चिखल दगड माती मुरूम यामुळे नागरिकांना अडथळा निर्माण होत असून दिवसभरासाठी वाहतुकीसही अडथळा होऊन या चिखल मातीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. परंतु सदरील मुरूम उपसा हा कायदेशीर आहे की बेकायदेशीर? मग हा कायदेशीर असेल तर दिवसा का उपसा केला जात नाही? आणि बेकायदेशीर असेल तर यावर प्रशासनाचे वचक किंवा लक्ष का नाही? किंवा या भागामध्ये दक्ष, जवाबदार असे जागृत प्रशासकीय अधिकारी, महसूल, पोलीस प्रशासन आणि जिल्हा परिषद् कर्मचारी यापैकी कोणीही नाही काय? असा प्रश्न या भागातील नागरिकाकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांसह तहसीलदार औसा घनशाम अडसूळ आणि जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी या बाबीकडे लक्ष देऊन अशा राष्ट्रीय संपत्तीचे होणारे विलुप्तीकरण थांबवावे आणि नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या रस्त्यावरील चिखल, माती, मुरूम अशी अडचणी दूर कराव्या अशी मागणी या भागातील नागरिकाकडून केली जात आहे.

महामार्गावरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वतंत्र, स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहांची व्यवस्था करा!

लातूर जिल्हा परिषदेचा सर्वानुमते ठराव; केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांच्याकडे अध्यक्ष उषा पाटील-तळेगावकर यांची मागणी

लातूर । प्रतिनिधी

महामार्गावरून प्रवास करणाऱ्या महिला, विद्यार्थिनी आणि महिला प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन महामार्गावरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वतंत्र, स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी लातूर जिल्हा परिषदेने केली आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या २२ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव क्रमांक ३९ मंजूर करण्यात आला असून, हा ठराव केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. उषा संभाजी पाटील-तळेगावकर यांच्या मान्यतेने हा ठराव केंद्रीय मंत्र्यांना सादर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्राद्वारे याबाबत अधिकृत मागणी करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातून अनेक महिला, विद्यार्थिनी तसेच नोकरदार महिला शिक्षण, नोकरी आणि विविध कामानिमित्त खाजगी ट्रॅव्हल्स व इतर वाहनांमधून महामार्गावरून प्रवास करतात. मात्र, खाजगी ट्रॅव्हल्सना थांबण्यासाठी निश्चित आणि पुरेशा सोयीसुविधांनी युक्त थांबे उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः महामार्गावर स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधा नसल्याने महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होते. स्वच्छतागृह उपलब्ध नसल्यामुळे अनेक महिला व विद्यार्थिनी प्रवासादरम्यान पाणी पिणेही टाळतात. ही बाब त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने गंभीर असून, महिलांच्या सुरक्षिततेचाही महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे महामार्गावरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वतंत्र, स्वच्छ, सुरक्षित आणि वापरण्यास योग्य स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात यावी, तसेच त्यांची नियमित स्वच्छता व देखभाल करण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी भूमिका जिल्हा परिषदेने घेतली आहे. या महत्त्वपूर्ण ठरावाच्या सूचक म्हणून जिल्हा परिषद सदस्या श्रीमती आशा शिवाजीराव भिसे यांनी भूमिका मांडली, तर अनुमोदक म्हणून जिल्हा परिषद सदस्या श्रीमती सोनाली रमेश थोरमोटे यांनी समर्थन दिले. त्यानंतर सर्वसाधारण सभेत हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

महिलांच्या आरोग्य, सन्मान आणि सुरक्षिततेशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन देशभरातील महामार्गांवरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महिला प्रवाशांच्या मूलभूत सुविधांसाठी लातूर जिल्हा परिषदेने घेतलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण मानला जात असून, या ठरावावर केंद्र सरकारकडून कोणती कार्यवाही होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दिवाळीच्या आनंदात राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाचा माणुसकीचा उपक्रम!

खुंटेफळ व माटेफळ येथील ८ गरजू महिलांना किराणा शिधावाटप; चार विद्यार्थ्यांच्या बारावीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

लातूर । प्रतिनिधी



खुंटेफळ, ता. जि. लातूर : दिवाळीचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि समाधान घेऊन यावा, या सामाजिक भावनेतून राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंच, माटेफळ यांच्या वतीने दिवाळीनिमित्त स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत खुंटेफळ येथील सहा आणि माटेफळ येथील दोन अशा एकूण आठ गरजू महिलांना दिवाळी किराणा शिध्याचे वाटप करण्यात आले. तसेच खुंटेफळ येथील चार विद्यार्थ्यांच्या बारावीपर्यंतच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी मंचाने स्वीकारून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला.

या किराणा शिध्यामध्ये गहू, साखर, साबुदाणा, रवा, चुरमुरे, मक्याचे पोहे, मेथी, चिवडा मसाला, चकली मसाला, गोडेतेल, कांदेपोहे, डाळ, चणाडाळ, गूळ आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. आर्थिक अडचणींमुळे सणाचा आनंद कमी होऊ नये, या उद्देशाने महिलांना हा मदतीचा हात देण्यात आला. या उपक्रमाचे विशेष महत्त्व म्हणजे खुंटेफळ येथील चार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी मंचाने स्वीकारली आहे. यामध्ये रणवीर अशोक शिंदे (इयत्ता अकरावी), राजवीर अशोक शिंदे (इयत्ता दहावी), विशाल सुग्रीव हराळे (इयत्ता दहावी) आणि संस्कार सुग्रीव हराळे (इयत्ता आठवी) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहू नये, गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहता यावे आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे, या उदात्त हेतूने मंचाने बारावीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. केवळ मदत करण्यापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

यावेळी राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाचे संस्थापक अध्यक्ष बापू खोसे, सचिव संतोष खोसे, बाळासाहेब पाटील, पत्रकार बाबासाहेब काळे, भैरवनाथ झाडके, रयत प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे ज्ञानेश्वर काळे सर, काशिनाथ खोसे, बी. व्ही. खोसे, बिभीषण घोडके, उमेश हराळे यांच्यासह इतर सहकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. समाजातील गरजू महिलांना मदतीचा आधार, विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी आणि वंचित घटकांना जगण्याचे बळ देण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंच सातत्याने करीत आहे. दिवाळीच्या निमित्ताने राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजात माणुसकी, सामाजिक जाणीव आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ करणारा ठरला. मदतीचा हात गरजू महिलांना, शिक्षणाची साथ विद्यार्थ्यांना आणि माणुसकीचा संदेश समाजाला देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

ज्येष्ठ पत्रकार वाकोडीकर व कस्तुरे यांना मुदखेड तालुका संघाच्या वतीने श्रद्धांजली

मुदखेड । प्रतिनिधी

दैनिक देशोन्नतीचे किनवट तालुका प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार कै. प्रदीप वाकोडीकर यांचे अपघाती निधन तर महाराष्ट्र टाइम्सचे प्रतिनिधी कै. गणेश कस्तुरे यांचे आजाराने निधन झाल्याने पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. या दोन्ही दिवंगत पत्रकारांना ११ नोव्हेंबर रोजी मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी दिवंगत पत्रकारांच्या उल्लेखनीय पत्रकारितेच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कै. प्रदीप वाकोडीकर यांनी आदिवासी व दुर्गम भागात पत्रकारिता करताना आपल्या लेखणीच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या समस्या, प्रश्न आणि कल्याणासाठी सातत्याने आवाज उठविला. तर कै. गणेश कस्तुरे यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत समाजहितासाठी मोलाचे योगदान दिले, अशा भावना मराठी पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय कोलते व मनोज कमटे यांनी श्रद्धांजलीपर मनोगतातून व्यक्त केल्या.

या श्रद्धांजली सभेस मराठी पत्रकार संघाचे जिल्हा सचिव ईश्वर पिनलवार, तालुका अध्यक्ष दिनेश शर्मा, रुखमाजी शिंदे नामदेव बिचेवार, शेख जब्बार, शेख शमशुद्दीन, आतिक अहेमद, संतोष सावंत, नामदेव राहेरे, संतोष दर्शनवाढ, अब्दुल रजाक, अमोल टेकले, अब्दुल हकीम, सौरभ चौदंते, अजय कांबळे यांच्यासह इतर पत्रकारांची उपस्थिती होती. तसेच नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष माधव पाटील कदम, उपाध्यक्ष इमरान सेठ मच्छीवाले, नगरसेवक प्रतिनिधी प्रभाकर पांचाळ, मुजीब पठाण, संदीप मोडवान, नगरसेवक संजय आऊलवार, संजय सोनटक्के, शेख बबलू, प्रीतम सिंह ठाकूर यांच्यासह विविध कार्यकर्ते व नगरसेवक प्रतिनिधींनीही उपस्थित राहून दोन्ही दिवंगत पत्रकारांना श्रद्धांजली अर्पण केली.


शेतकऱ्यांचे बेमुदत आंदोलन स्थगित

खा.डॉ.अजित गोपछडे यांचा शिष्टाईला यश; हिवाळी अधिवेशनात प्रश्न मांडून सोडविण्याचे खा.गोपछडे यांचे आश्वासन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

पोचमपाड बंधाऱ्याच्या बॅक वॉटर आणि सबस्टेशनची, पीक विमा, कर्जमाफी आदी मागण्या संदर्भात शेतकऱ्यांनी बिलोली तालुक्यातील चिरली येथे गोदावरी नदी पात्रात सुरू केलेले बेमुदत आंदोलन अखेर स्थगित करण्यात आले. खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली व त्यांचे प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडून सोडविण्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

दिग्रस, चिरलीसह गोदावरी नदीकाठच्या शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी नदीपात्रात बेमुदत आंदोलन सुरू केले होते. याची माहिती मिळताच खा. डॉ. गोपछडे यांनी राज्य शासन व केंद्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. त्यांनी शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न शांतपणे ऐकून घेतले. यावेळी बोलताना खा.डॉ.गोपछडे म्हणाले, कोल्हापूरच्या धर्तीवर या भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न मिटविण्यासाठी मी राज्य शासन व केंद्र शासनाचा



प्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांच्या बाजूने शिष्टाई करणार आहे. बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात फेरविचार याचिका दाखल करण्यासाठी या भागातील ग्रामपंचायतींचे ठराव घेणार आहोत. याबाबत राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारकडेही विनंती करणार आहोत.

कुंडलवाडी आणि धर्माबाद शहराचे पिण्याचे पाणी अवघ्या पंधरा दिवसात संपणार असल्याची गंभीर बाबही त्यांनी यावेळी मांडली. देवापूर, युपीपी आणि बेळगाव बंधाऱ्याच्या माध्यमातून या भागात तातडीने पाणी सोडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सांगणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या इतर प्रमुख मागण्यांमध्ये सबस्टेशनची मागणी, पीक विमा, कर्जमाफी यासारख्या छोट्या-मोठ्या विषयांचा समावेश होता. हे सर्व विषय हिवाळी अधिवेशनात सरकारी दरबारी मांडून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन, व्ही.के. पाटील यांची बैठक लावून तात्काळ मिटविण्याचे आश्वासन खासदारांनी दिले.

तुमचा प्रतिनिधी म्हणून, या भागाचा प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री आणि व्ही.के. पाटील यांच्याकडे जाऊन ही शिष्टाई यशस्वी करण्याची जबाबदारी मी स्वतः घेतलेली आहे, असे सांगत त्यांनी आंदोलन थांबविल्याबद्दल शेतकऱ्यांचे आभारही मानले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, उमाकांत गोपछडे, हावगीरराव गोपछडे, हजप्पा पाटील सुंकलोड, शांतेश्वर पाटील लघुळकर, अभिजीत धरमूरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आन्दोलन स्थळी कायदा व सुव्यवस्था आबादीत नादावे या करीता कुंडलवाडी पोलिस ठाण्याचे प्रभारी साह्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे व त्यांचे पोलिस कर्मचारी बंदोबस्तीत उपस्थित होते.

रिद्धिश्री दूध संकलन केंद्राकडून दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचा दिवाळीनिमित्त सन्मान; सामाजिक बांधिलकीचा अनोखा उपक्रम

मुदखेड । अतिक अहमद

शेतीच्या जोड व्यवसायासोबत दुग्ध व्यवसायाची कास धरलेल्या शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान रिद्धीश्री दूध संकलन केंद्राच्या वतीने करण्यात आला असून दिवाळीची अनोखी भेट देऊन दुष्काळाच्या सावटातून शेतकऱ्यांना सावरण्याची ताकद देण्यासाठी सुख-समृद्धीची आराधना करण्यात आली असून सामाजिक बांधिलकीचा उपक्रम कौतुकास्पद व प्रेरणादायी करत आहे.

बारड ता (मुदखेड) श्री रिद्धिश्री दूध संकलन केंद्राच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि.१० (मंगळवार) दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळी भेटीचे वितरण करण्यात आले आहे. शेती व्यवसायाला पूरक व नियमित आर्थिक उत्पन्नाचा आधार म्हणून दुग्ध व्यवसाय शेतकऱ्यांचा जोड व्यवसाय आहे. सातत्याने वर्षभर दुग्ध उत्पादक शेतकरी संकलन



केंद्राला दूध पुरवठा करत असतात. या व्यवसायाच्या माध्यमातून कुटुंबाच्या आर्थिक व्यवहाराला हातभार लावणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुग्ध व्यवसायाची दखल घेणे, सन्मान करणे, दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमागचा मुख्य उद्देश आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांसोबतचे दिवाळीचे नाते व दिवाळी सारख्या मुख्य सणाच्या आनंदात सहभागी होता यावे या भावनेतून दिवाळी भेट देण्याची रिद्धीश्री दूध संकलन केंद्राने परंपरा जोपासली आहे.

दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांचा टोपी, दस्ती व आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले आहे. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी अल्पो आहाराचे आयोजन करण्यात आले होते. दुष्काळातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना सुख-समृद्धी मिळावी यासाठी सामूहिक महाआरती आराधना करण्यात आली. प्रतिष्ठित नागरिक गंगाधरराव आमदूरकर, सामाजिक कार्यकर्त्या वंदना जयस्वाल, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक शंकर लोमटे, सुधाकर आमदूरकर, माजी ग्रामपंचायत सदस्य बालाजी आम्रे, संभाजी ब्रिगेडचे माजी तालुकाध्यक्ष सतीश व्यवहारे यांच्या हस्ते दिवाळी भेट वस्तू देण्यात आली आहे. यावेळी रिद्धीश्री दूध संकलन केंद्राचे संचालक प्रताप देशमुख बारडकर, प्रतीक चवरकर, शेख शहबाज, गोविंद माळकोठे, विकास कत्रे, प्रशांत हंबर्डे, महेश राहेरकर, मुजम्मिल मोमीन यांची उपस्थिती होती. दुग्ध उत्पादक शेतकरी रवी सूर्यवंशी, मुक्तार पठाण, मारुती लोमटे, आसिफ पठाण, मुकुंद कोरबनवाड, दिलीप कोरबनवाड, सुरेश व्यवहारे, विजय व्यवहारे, माधव डांगे, प्रकाश पिल्लेवाड, प्रदीप फुलारी, साई बोंथले, परमेश्वर कटके यांच्यासहआदी दुग्ध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान करत त्यांच्या आनंदात सहभागी होणे आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. रिद्धीश्री दूध संकलन केंद्राच्या वतीने देण्यात आलेली ही दिवाळी भेट केवळ सणापुरती मर्यादित नसून, दूध उत्पादक शेतकरी आणि दूध संकलन केंद्र यांच्यातील विश्वास, आपुलकी व जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करणारी ठरली आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य सन्मान मिळावा, त्यांच्या दुग्ध व्यवसायाला सातत्याने प्रोत्साहन मिळावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळावी, ही आमची प्रामाणिक भूमिका आहे. सध्या तालुक्यावर असलेले दुष्काळाचे सावट दूर होऊन बळीराजाच्या आयुष्यात पुन्हा सुख, समृद्धी आणि आनंदाचे दिवस यावेत, हीच मनापासूनची भावना असल्याचे रिद्धीश्री दूध संकलन केंद्राचे संचालक प्रताप देशमुख बारडकर यांनी व्यक्त केले.

ऊसतोड कामगारांसोबत भाऊराव चव्हाण कारखान्याची दिवाळी; चेअरमन नरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते शाल व फराळाचे वाटप

अर्धापूर । संजय पंडित

दिवाळी हा सण आनंद, उत्साह, आपुलकी आणि माणुसकीचा संदेश देणारा सण आहे. मात्र, आपल्या कुटुंबापासून दूर राहून ऊसतोडणीचे काम करणाऱ्या कामगारांना सणासुदीच्या काळातही आपल्या कर्तव्याला प्राधान्य द्यावे लागते. अशा कष्टकरी ऊसतोड कामगारांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याच्या उद्देशाने भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना, डोंगरकडा यांच्या वतीने ऊसतोड कामगारांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.

यावेळी कारखान्याचे चेअरमन नरेंद्र दादा चव्हाण यांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना शाल व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. सणाच्या आनंदात कामगारांनाही सहभागी करून घेत त्यांच्या कष्टप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. ऊसतोड कामगार हे साखर कारखान्याच्या गळीत हंगामातील



अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. ऊन, वारा, थंडी यांची पर्वा न करता रात्रंदिवस मेहनत करून हे कामगार ऊसतोडणीचे काम करतात. त्यांच्या कष्टावरच साखर उद्योगाची चाके गतिमान राहतात. त्यामुळे त्यांच्या श्रमाचा सन्मान व्हावा आणि त्यांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, या भावनेतून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी कारखान्याचे चेअरमन नरेंद्र दादा चव्हाण यांच्यासह कारखाना संचालक व्यंकटराव साखरे, शेती समिती अध्यक्ष व्यंकट मामा कल्याणकर, मुख्य शेतकी अधिकारी हरकळ, विभाग प्रमुख हिवंत, गोविंद खानसोळे तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. दिवाळीच्या निमित्ताने कष्टकरी कामगारांच्या आनंदात सहभागी होत त्यांच्या श्रमाचा सन्मान करण्याचा कारखाना प्रशासनाचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. कष्टकऱ्यांच्या घामाचा सन्मान आणि त्यांच्या आनंदात सहभागी होण्याची भावना या उपक्रमातून अधोरेखित झाली.

धर्माचे पालन करा, संस्कार जपा अन् सदाचरणाचा मार्ग स्वीकारा!

महेंद्र मस्के महाराजांचे नागेली येथे कीर्तनातून प्रबोधन; व्यसनमुक्ती आणि हिंदू संस्कृती संवर्धनाचे आवाहन

मुदखेड । अतिक अहमद

जीवन जगताना प्रत्येकाने धर्माचे पालन करावे. मोठ्यांनी करंटेपणा, तरुणांनी तारुण्याचा गैरवापर सोडून सदाचरणाचा मार्ग स्वीकारावा, असे प्रभावी प्रबोधन महेंद्र मस्के महाराज यांनी केले. नागेली येथे दीपावलीनिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात ते बोलत होते. त्यांच्या कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी मस्के महाराज यांनी हिंदू धर्माचे रक्षण, संस्कृतीचे संवर्धन आणि पारंपरिक मूल्यांचे जतन करण्याचे महत्त्व विशद केले. शेतकऱ्यांनी शेतीसोबत गोपालनाला प्राधान्य देऊन संस्कृतीचे जतन करावे. महिलांनी कुटुंबातील संस्कारांची परंपरा जपत मुलांवर चांगले संस्कार करावेत, तर तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता आपली ऊर्जा विधायक कार्यासाठी खर्च करावी, असे आवाहन त्यांनी केले.



संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा दाखला देत त्यांनी धर्म, भक्ती आणि सदाचाराचे महत्त्व पटवून दिले. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांतून परोपकार, दया, सत्य, सद्वर्तन आणि ईश्वरभक्तीचा संदेश दिला आहे. केवळ धार्मिक विधी करणे म्हणजे धर्म नव्हे, तर आपल्या आचरणातून माणुसकी जपणे हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले. दीपावलीच्या मंगलमय पर्वावर आयोजित या कीर्तनातून सामाजिक प्रबोधनासह धर्म, संस्कृती आणि संस्कारांचा संदेश देण्यात आला. कीर्तन सोहळ्याला ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गोविंदराव नागेलीकर, विलासराव गव्हाणे, उत्तमराव लोमटे, दिलीपराव कोरे, पांडुरंग शिंदे, संजयराव मुलंगे, नामदेव बिचेवार, आनंदराव शिंदे, गोविंदराव गव्हाणे, तुकाराम शिंदे, पिंटू पुयड, साईनाथ गव्हाणे, मारोतराव शिंदे, नंदू पुयड, उत्तम पुयड, शंकर उमाटे, शिवाजी शिंदे, गजानन गव्हाणे आदींसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

अंधारात दिवा लावणारी ठक्करवाड मित्रपरिवाराची वंचितांसोबत दिवाळी

कुंडलवाडी । प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण, आनंदाचा सण. मात्र यंदा राज्यात दुष्काळ परिसस्थीत असल्याने दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन परिसरात एक वेगळी, हृदयाला भिडणारी दिवाळी साजरी करण्यात आली. गाजावाजा, फटाक्यांचा आवाज आणि मोठा खर्च टाळून, खऱ्या अर्थाने माणुसकीची दिवाळी साजरी झाली. दि.१० नोव्हेंबर रोजी कासराळी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण ठक्करवाड यांच्या पुढाकारातून पालावर राहणाऱ्या वंचित बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली.



पालावर राहणारे हे बांधव रोजच्या जगण्यासाठी संघर्ष करतात. त्यांच्यासाठी दिवाळी म्हणजे फक्त दुसऱ्यांच्या घरात लागलेले दिवे पाहणे. हीच जाणीव ठेवून ठक्करवाड मित्रमंडळाने थेट त्यांच्या पालावर जाऊन दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी वंचित बांधवांसोबत बसून आनंदाचे क्षण घालविले. लहान मुलांना, महिलांना व वृद्धांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देत, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. काही काळ का होईना, पालावरील चेहऱ्यावर हसू फुलले होते. हीच खरी दिवाळी असल्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली.

दिवाळी फक्त आपल्या घरापुरती मर्यादित न ठेवता, समाजातील वंचितांपर्यंत आनंद पोहोचवणे हेच आपले कर्तव्य आहे. दुष्काळाच्या काळात आपण साधेपणाने सण साजरा करून दुसऱ्याला मदत केली पाहिजे, असे मत यावेळी लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, हज्जाप्पा पाटील आरळिकर, राजेंद्र तोटावाड, रेड्डी लोहगांवकर, भगवान पाटील, बालाजी देशमुख, माधव कासराळीकर, हाणमतराव खरबाळे, शंकर गांगुलवार यांच्यासह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील शेवटच्या घटकासोबत दिवाळी साजरी केल्याबद्दल ठक्करवाड मित्रमंडळाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

कुंडलवाडीत दिवाळी पाडवा उत्साहात साजरा

फटाक्यांच्या आतषबाजीने शहर दुमदुमले; लक्ष्मीपूजन व पान सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कुंडलवाडी । प्रतिनिधी

भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा आणि आनंदाचा सण असलेली दिवाळी कुंडलवाडी शहरात मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. दि.१० नोव्हेंबर रोजी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर शहरातील व्यापारी व नागरिकांनी श्री लक्ष्मी मातेचे विधिवत पूजन करून फटाक्यांची आतषबाजी करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. दिवाळी हा पाच दिवसांचा सण आहे. धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज अशा पाच दिवसांत हा सण साजरा केला जातो. यामुळे दिवाळीला सर्वात मोठा सण मानले जाते. यंदाच्या दिवाळी निमित्त नागरिकांनी आपापल्या घरावर रंगरंगोटी, आकर्षक सजावट, तोरणे, रांगोळ्या व विद्युत रोषणाई केली होती. संपूर्ण शहर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाले होते.

दि.१० नोव्हेंबर रोजी शहरात श्री लक्ष्मी पूजन व पान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला माजी जि.प.सदस्य लक्ष्मणराव ठाकरवाडी, राजेंद्र तोटावाड, नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलवार, पंढरीनाथ दाचावार, दत्तूसेठ यंकावार, राजेश्वर उत्तरवार, साईनाथ उत्तरवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, दिनेशसेठ दाचावार, शैलेश यंकावार, सुनील बेजगमवार, अशोक गरुडकर, डॉ.प्रशांत सब्बनवार, डॉ.संतोष पाटील, शेख मुखतार, नसीर काझी, नरसिंह चौहान, साहेबराव डोंगरे, पत्रकार मोहम्मद अफजल, शेख फसियोद्दीन यांच्यासह शहरातील नगरसेवकासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नागरिकांची व व्यापाऱ्यांची भेट घेत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिवाळी हा केवळ सण नसून, अंधाराकडून प्रकाशाकडे, वाईटाकडून चांगल्याकडे जाण्याचा संदेश देणारा सण असल्याचे सांगितले. सर्वांनी एकोप्याने, आनंदाने आणि सुरक्षितपणे सण साजरा करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. संपूर्ण दिवसभर शहरात उत्साहाचे वातावरण होते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनी फटाके फोडून, मिठाई वाटून व एकमेकांना शुभेच्छा देऊन दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. पोलीस प्रशासनाच्या वतीनेही शहरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता, त्यामुळे सण शांततेत व उत्साहात पार पडला.

आंबेडकरी युवा कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांना 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चेतना पुरस्कार' जाहीर

२१ नोव्हेंबरला कुसुम सभागृहात यशोधरा गौरव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते होणार सन्मान; सामाजिक कार्याची घेतली दखल

नांदेड । प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीत सक्रिय योगदान देत सामाजिक प्रबोधन, जनजागृती आणि बौद्ध संस्कृती व विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले आंबेडकरी युवा कार्यकर्ते आयु. सुभाष लोखंडे यांची प्रतिष्ठेच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चेतना पुरस्कारा'साठी निवड करण्यात आली आहे. भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून बी.आर. फाऊंडेशन, नांदेड यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 'यशोधरा गौरव सोहळा व पुरस्कार वितरण समारंभा'त त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

आंबेडकरी विचारधारेचा वारसा जपत तथागत गौतम बुद्ध यांची मानवतावादी शिकवण, बौद्ध संस्कृती आणि संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सुभाष लोखंडे यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची या पुरस्कारासाठी निवड करताना दखल घेण्यात आली आहे. सामाजिक प्रबोधन, जनजागृती आणि आंबेडकरी चळवळीतील त्यांचा सक्रिय सहभाग यामुळे त्यांनी समाजात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. बी.आर. फाऊंडेशनच्या वतीने भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेल्या महाभिक्षुणी यशोधरा यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य महानाट्याचे सादरीकरणही या सोहळ्यात करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आंबेडकरी, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि प्रशासकीय क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.



हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि.२१ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कुसुम सभागृह, नांदेड येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात खासदार रविंद्र चव्हाण आणि ख्यातनाम गायिका पुष्पा पगधरे मुंढे यांच्या हस्ते मानचिन्ह, मानपत्र/ग्रंथपत्र आणि शाल देऊन आयु. सुभाष लोखंडे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

निवडीमुळे आंबेडकरी चळवळीत आनंदाचे वातावरण

सुभाष लोखंडे यांची प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड झाल्याची बातमी समजताच नांदेड जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीसह विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

अभिनंदन करणाऱ्यांमध्ये सेवानिवृत्त उपआयुक्त प्रकाश येवले, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सावळे, प्रा. गौतम धुथडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया जिल्हाध्यक्ष मिलिंद शिराढोणकर, इंजिनिअर डी. एम. निखाते, भारतीय बौद्ध महासभेचे उत्तर नांदेड जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, सरचिटणीस दामोदर सरकटे, कोषाध्यक्ष सुभाष नरवाडे, उत्तर शहराध्यक्ष ईश्वरराव जोंधळे, सरचिटणीस रमेश कोकरे, विजय खिल्लारे, कोषाध्यक्ष रामराव कदम, सेवानिवृत्त पीएसआय श्रीरंग कापुरे, बहुजन समाज पार्टीचे मराठवाडा पदाधिकारी राहुलजी कोकरे, सेवानिवृत्त शिक्षक संजय कापुरे, सहाय्यक अधीक्षक सुनीलराव खिल्लारे, इंजिनिअर संदेश थोरात, सेवानिवृत्त गट निदेशक ज्ञानोबा दुधमल, बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी मुंजाजी कांबळे, लॉर्ड बुद्धा चॅनलचे जिल्हा प्रतिनिधी सदाशिव गच्चे, संजय पंडित, शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी येथील कर्मचारी, राजेश नरवडे, पृथ्वीराज विश्वनाथ चिंतुरे, इर्शाद शेख, ज्योतीताई जाधव, प्रशांत झिंजाडे, राहुल गायकवाड, रमेश सातोरे, गंगाधर शिराढोणकर, नरेश चित्रप्पु, संदीप झिंजाडे, राहुल बहादुरे, ड. रतन धुळे, रंगनाथ कांबळे, सचिन मस्के, मनोज वाघमारे, सिद्धांत हटकर आणि प्रशांत लोखंडे आदींचा समावेश आहे. सुभाष लोखंडे यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या सामाजिक कार्याची पोचपावती मानली जात असून, त्यांच्या निवडीमुळे आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्त्यांना सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी नवी प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक ालासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com
PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com
PRGI.No.- MHMAR/26/A0270

13 Nov 2026_Layout 1 11/12/2026 10:44 PM Page 2

टँकरने पाणी आणून जगविलेल्या शिमला मिरचीच्या पिकावर तणनाशकाचा घाला!

अज्ञात व्यक्तीची विषारी फवारणी; दोन एकरांतील पीक उद्ध्वस्त, शेतकऱ्याचे दहा लाखांहून अधिक उत्पन्न धोक्यात

धारूर/अतुल शिनगारे

एकीकडे दुष्काळामुळे पाण्याचा थेंब मिळविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असताना दुसरीकडे टँकरने पाणी विकत आणून मोठ्या कष्टाने जगविलेल्या शिमला मिरचीच्या पिकावर अज्ञात व्यक्तीने तणनाशकाची फवारणी करून ते उद्ध्वस्त केल्याचा धक्कादायक प्रकार केज तालुक्यातील ढाकेफळ येथे उघडकीस आला आहे. दोन एकर क्षेत्रातील सुमारे २० हजार



शिमला मिरचीच्या रोपांचे नुकसान झाल्याने शेतकरी राजकुमार थोरात यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. या पिकातून अपेक्षित असलेले दहा लाखांहून अधिक रुपयांचे उत्पन्न हातचे जाण्याची भीती व्यक्त होत आहे. केज तालुक्यातील ढाकेफळ, कुंभेफळ, गांजपूर आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर पालेभाज्यांचे उत्पादन घेतले जाते. याच परिसरातील ढाकेफळ येथील शेतकरी राजकुमार थोरात यांनी आपल्या सहा एकर (पान २ वर)

पंकजाताईंसोबत भाऊबीज, तर

मुख्यमंत्र्यांकडे शेतकऱ्यांना मदतीची मागणी





मुंबई/प्रतिनिधी

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे आज ऐन दिवाळी-भाऊबीज असताना मुंबईत शेतकऱ्यांसाठी सक्रीय असल्याचे पाहायला मिळाले. सकाळी त्यांनी लहान भगिनी पंकजाताई मुंडे यांच्या समवेत भाऊबीज साजरी केली. त्यानंतर काही वेळेतच ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी दुष्काळी परिस्थितीत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्याची मागणी केली.

ऐन दिवाळीत धनंजय मुंडे मुंबईत असून त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा देत त्यांच्याकडे शेतकऱ्यांना अधिकची मदत देण्याबाबत विनंती केली असता, सरकार संपूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी असून जास्तीत जास्त आर्थिक मदत केली जाईल, असे श्री मुंडे यांना मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले.

त्याआधी सकाळी रामटेक या पंकजाताईंच्या शासकीय निवासस्थानी भाऊबीज निमित्त पंकजाताई मुंडे यांनी बंधू धनंजय मुंडे यांचे औक्षण केले. त्याचबरोबर धनंजय मुंडे यांनी आपल्या बहिणी माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे व यशश्रीताई मुंडे यांचीही भेट घेत भाऊबीज साजरी केली. यावेळी त्यांनी एकमेकांना दिवाळी व भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या.

आई-वडिलांना ऊसतोडीच्या कामात मदत करण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय

अमोलचा टायरच्या गाडीखाली दबून मृत्यू

धारूर/अतूल शिनगारे



बीड जिल्ह्यातील भीषण दुष्काळामुळे ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला असून, उदरनिर्वाहासाठी अनेक कुटुंबांना गाव सोडून ऊसतोडणीच्या कामासाठी परजिल्ह्यात स्थलांतर करावे लागत आहे. अशाच परिस्थितीत आई-वडिलांना ऊसतोडणीच्या कामात मदत करण्यासाठी गेलेल्या धारूर तालुक्यातील पिंपरवाडा येथील २२ वर्षीय अमोल बंडू तिडके या तरुणाचा टायरच्या गाडीखाली दबून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने पिंपरवाडा गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

अमोल बंडू तिडके (वय २२, रा. पिंपरवाडा, ता. धारूर) हा आपल्या आई-वडिलांसोबत ऊसतोडणीच्या कामासाठी लातूर जिल्ह्यातील श्री संत गोपाळबुबा महाराज शुगर, रूई-रामेश्वर येथे गेला होता. अल्पशिक्षित असलेल्या अमोलने तरुण वयातच कुटुंबाची जबाबदारी ओळखून आई-वडिलांना आर्थिक हातभार लावण्यास सुरुवात केली होती. मात्र, ऊसतोडणीच्या कामाच्या ठिकाणी टायरच्या गाडीखाली दबून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

गावात रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्याने आणि यंदा (पान २ वर)

सोनपेठ च्या संत सेना महाराज मंदिराच्या अपूर्ण कामाला गती मिळणार

सोनपेठ/सुभाष सावत



सोनपेठ शहरातील संत सेना महाराज मंदिराच्या अपूर्ण राहिलेल्या कामाला गती मिळावी आणि हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, या मागणीसाठी माननीय नगराध्यक्ष परमेश्वर भैया कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महत्त्वपूर्ण ठराव पारित करण्यात आला. या निर्णयाबद्दल नाभिक समाजाच्या वतीने नगराध्यक्ष परमेश्वर भैया कदम यांच्यासह सर्व नगरसेवकांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

संत सेना महाराज हे नाभिक समाजाचे श्रद्धास्थान असून त्यांच्या मंदिराचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण होणे ही समाजाची अनेक दिवसांपासूनची अपेक्षा आहे. या कामाला गती देण्यासाठी नगराध्यक्ष परमेश्वर भैया कदम यांनी पुढाकार घेतल्याने समाजामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी नाभिक समाजाचे (पान २ वर)

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी

परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची घेतली भेट

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



परळी तालुक्यात अत्यल्प पावसामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून जनावरांच्या चारा-पाण्याचाही प्रश्न गंभीर होत आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी. मनरेगा, जलतारा अभियान, सिंचन विहिरी, घरकुल, शेततळे, गायगोठे तसेच जलजीवन मिशनची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ आणि शेतकऱ्यांना त्यांच्या कामाची देयके वेळेत मिळाली पाहिजेत. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी व सामान्य नागरिकांची कोणत्याही कारणाने अडवणूक होऊ नये. प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन पाणीटंचाई व दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी केली आहे.

अत्यल्प पावसामुळे परळी तालुक्यात दुष्काळाचे सावट गडद होत असून अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते उत्तमराव माने यांनी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांची भेट घेऊन तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती आणि ग्रामीण भागातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी व्ही.बी.-जी राम जी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, मनरेगा अंतर्गत विविध योजनांचा पात्र शेतकरी व लाभार्थ्यांना लाभ द्यावा तसेच प्रलंबित कामांची देयके (पान २ वर)

सर्वसामान्य जनतेच्या संकटात सतत पाठीशी एकनाथ शिंदे-आ.सईद खान

राजकारणात समाजकारण करणारे एकमेव एकनाथ शिंदे-अनिल दादा जगताप

माजलगाव/प्रतिनिधी



निसर्गाच्या लहरीपणामुळे दुष्काळ, अतिवृष्टी आदी संकटांच्या काळामध्ये सर्वसामान्य जनतेच्या संकटात सतत एकमेव शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच पाठीशी आहेत, असे मत परभणी-हिंगोलीचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे आमदार सईद भैय्या खान यांनी व्यक्त केले.

तर राजकारण करणारे अनेक नेते आहेत, परंतु राजकारणातून सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी समाजकारण करणारे एकमेव शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे असल्याचे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी व्यक्त केले.

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेवरून शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्रभर गरजूवंतांना दिवाळी आनंदाच्या शिध्याचे वाटप झाले आहे. त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव तालुक्यातही गरजूवंतांना आनंदाचा शिधा वाटपाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सईद भैय्या खान आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप बोलत होते.

यावेळी आमदार सय्यद खान म्हणाले, ''एकनाथ शिंदे साहेबांनी नेहमीच सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून काम केले आहे. संकट काळात ते फक्त भाषण करत नाहीत, तर थेट मदत घेऊन जनतेच्या दारी पोहोचतात. हीच खरी शिवसेना आहे.''

जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप म्हणाले, ''दिवाळी हा आनंदाचा सण. हा आनंद प्रत्येक गरजू कुटुंबाच्या घरात पोहोचला पाहिजे, हीच शिंदे साहेबांची भूमिका आहे. त्यामुळेच आज माजलगाव तालुक्यात हा उपक्रम राबवला जात आहे.''

या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, शिवसेनेचे बीड जिल्हा सचिव सुनील अनभुले, अध्यात्मिक शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ह.भ.प. सर्जेराव महाराज, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके, रामभाऊ जगताप, शिवसेना अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख मोहम्मद शेख, युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, (पान २ वर)

पाथरी नगर परिषदेतील शिवसेना (शिंदे) च्या दोन नगर सेवकांचे राजीनामे

परभणी जिल्हा अधिकारी यांच्या कडे राजीनामे सादर; आ.राजेश विटेकर यांच्या नेतृत्वात करणार राष्ट्रवादीत प्रवेश

पाथरी/आवडाजी ढवळे



पाथरी नगर परिषदेतील शिवसेना(शिंदे)गटाचे वार्ड क्र.७ चे नगर सेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब व नगर सेवक हासीब खान तहजीब खान यांनी काल आपल्या नगर सेवकपदाचे परभणी जिल्हाअधिकारी यांच्याकडे राजीनामे देवुन पाथरी शहराच्या राजकारनात खळबळ उघवुन दिली आसुन लवकरच आ.राजेश विटेकर यांच्या नेतृत्वात पक्ष प्रवेश करणार आसल्याची जोरदार चर्चा

सविस्तर वृत्त आसे कि शिवसेना (शिंदे)चे परभणी-हिंगोली विधान परिषदचे आ.सईद खान यांच्या नेतृत्वात पाथरी नगर परिषद वार्ड क्र.७ चे नगर सेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब व नगर सेवक पठाण हासीब खान तहजीब खान यांनी काल दि.१२/११/२०२६ रोजी परभणी जिल्हा निवडुन दिले होते परंतु नगर सेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब व नगर सेवक पठाण हासीब खान तहजीब खान यांनी काल दि.१२/११/२०२६ रोजी परभणी जिल्हा अधिकारी यांच्याकडे आपल्या नगर सेवक पदाचे राजीनामे सादर करुन खळबळ उडवुन दिली आसुन लवकरच आ.राजेश विटेकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षात (पान २ वर)











दहा दिवसांपासून महालॅबची रक्त तपासणी सेवा ठप्प

धारूर/अतुल शिनगारे

शासकीय रुग्णालयांमध्ये सर्वसामान्य रुग्णांसाठी उपलब्ध असलेली महालॅब रक्त तपासणी सेवा मागील दहा दिवसांपासून बंद असल्याने बीड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचा कारभार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना आवश्यक रक्त तपासण्यांसाठी खासगी प्रयोगशाळांचे दरवाजे ठोठावावे लागत आहेत. शासन आणि संबंधित कंपनीच्या आर्थिक वादाचा फटका मात्र सर्वसामान्य रुग्णांना बसत असून, आरोग्य विभागाच्या उदासीनतेमुळे रुग्णांची परवड होत आहे. शासकीय आरोग्य संस्थांमध्ये महालॅबच्या माध्यमातून विविध रक्त तपासण्या मोफत किंवा सवलतीच्या (पान २ वर)





जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

प्रशांत राम लांडगेची एमबीबीएससाठी निवड; मथुरेच्या नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश!

खेड । प्रतिनिधी

तालुक्यातील पहिली यात्रा वरसुबाई दुसरी यात्रा धामणगाव तर तिसरी यात्रा औंढे येथे कोळोबा देवाची झाली असून दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता औंढे येथील ग्रामस्थांनी साध्या पद्धतीत यात्रा करण्याचे ठरवले होते व त्या पद्धतीने जास्त खर्चाच्या गोष्टी कमी करून दिवाळी व यात्रा साजरी करण्यात आली. कोळबा महाराजांची वार्षिक यात्रा ही डोंगरावरती असल्याने शेजारील अनेक गावांनी डोंगरावरती यात्रेनिमित्त गर्दी केली होती.

गावातील दुधाचे संकलन ४०० ते ५०० लिटर असून या दिवशी कोणीही दूध डेरी वर घालत नाही. सकाळी दुधाच्या कावडी डोंगरावरील देवाला दुग्धाभिषेक केला जातो. दुपारी पालखी डोंगरावर जाते. संध्याकाळी पालखी मिरवणूक नंतर भजनी भारुड व दुसऱ्या दिवशी हजेरी तसेच दुपारी आखाड्याचा कार्यक्रम होत असतो. त्यामुळे या यात्रेला अनेक भागातून कुस्ती शोकीन व अनेक गावातून लोक हजेरी लावत असतात परंतु यावेळी दरवेळीचा अंदाज पाहता दुष्काळी परिस्थिती असल्याने यावेळी गर्दीचे प्रमाण कमी पहावयास मिळाले. त्यावेळी अनेक दमदार नेत्यांनी हजेरी लावली. माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल भाऊ देशमुख, जिल्हा परिषद सदस्य समीर सुपे, पंचायत समिती सदस्य दिनेश हांडे, पश्चिम भागाचे नेते किरण मुके त्वचारोग तज्ञ व उद्योजक डॉक्टर सुशील सावंत, सभा विजय शिंदे यांनी उपस्थिती लावली.

यावेळी गावचे सरपंच प्रदीप शिंदे, यात्रा कमिटी अध्यक्ष दत्ताभाऊ शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे, उपसरपंच निलेश यादव, मा उपसरपंच धोंडीभाऊ शिंदे, पोलीस पाटील उल्हास शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बबनराव शिंदे, मा. सरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष सतीश शिंदे, अध्यक्ष विश्वनाथ शिंदे, मा. सरपंच अशोक शिंदे, चेअरमन नामदेव शिंदे, पुंडलिक शिंदे, मा अध्यक्ष मारुती शिंदे, अंकुश शिंदे, दत्ता मारुती शिंदे पाटील, बुवा शिंदे, नवनाथ शिंदे, माऊली आवळे, ज्ञानदेव गोपाळे यांच्यासह गावातील अनेक आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

स्वच्छ सर्वेक्षणात महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठरली अव्वल; राष्ट्रीय पुरस्काराने गौरव

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विज्ञान भवनात पुरस्कार प्रदान; महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वीकारला सन्मान

केंद्रीय मंत्री मनोहर लाल, राज्यमंत्री तोखन साहू यांची उपस्थिती; प्रशासकीय नियोजन, सफाई सेवकांचे अहोरात्र परिश्रम आणि नागरिकांच्या सहभागाची राष्ट्रीय स्तरावर दखल

पिंपरी । बद्रीनारायण घुगे

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, राज्यातील सर्वाधिक स्वच्छ शहराचा बहुमान मिळविला आहे. शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी महापालिकेने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावरही दखल घेण्यात आली असून, महानगरपालिकेला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आदी उपस्थित होते. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी कार्यमंत्री मनोहर लाल, केंद्रीय राज्यमंत्री तोखन साहू, संबंधित विभागाचे सचिव सतेंद्र सिंह आणि सचिव डी. थारा यांच्यासह केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी या सोहळ्यास उपस्थित होते. महाराष्ट्रात मिळालेल्या प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने पिंपरी चिंचवड शहराच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.



स्वच्छतेच्या बाबतीत शहराची कामगिरी उंचावण्यासाठी केवळ महापालिका यंत्रणेच्या माध्यमातून स्वच्छता राखण्याऐवजी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात स्वच्छतेची शिस्त रुजविण्यावर महानगरपालिकेने भर दिला आहे. कचऱ्याचे उगमस्थानी विलगीकरण, नियमित संकलन, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि पुनर्वापर या बाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात आले. या प्रयत्नांना तंत्रज्ञानाची जोड आणि विविध प्रशासकीय विभागांचा समन्वय मिळाल्याने शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक संघटित आणि परिणामकारक स्वरूप प्राप्त झाले. या कामगिरीची दखल राज्यासह राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या समन्वयातून महापालिका प्रशासनाकडून शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा घडविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आरोग्य विभागाच्या माध्यमातून स्वच्छताविषयक योजनांची अंमलबजावणी, क्षेत्रीय स्तरावरील देखरेख, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांमध्ये जनजागृती यावर विशेष भर देण्यात आला आहे.

कचरा व्यवस्थापनाला व्यापक स्वरूप: शहरातील कचरा व्यवस्थापन हा स्वच्छता मोहिमेचा केंद्रबिंदू मानून ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यापासून त्यावर योग्य प्रक्रिया करण्यापर्यंतची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाला चालना देण्यासाठी आर.आर.आर. केंद्रांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. वापरण्यायोग्य वस्तूंचा पुनर्वापर, पर्यावरणपूरक उपक्रम आणि कचऱ्यापासून संसाधननिर्मिती यांसारख्या संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात आले.

सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, उद्याने आणि नागरी सुविधांच्या परिसरात स्वच्छता राखण्याबरोबरच नागरिकांमध्ये कचरा व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध मोहिमा राबविण्यात आल्या. स्वच्छतेचे नियम केवळ अभियानापुरते मर्यादित न राहता त्यांचे दैनंदिन जीवनात पालन व्हावे, यासाठी गृहनिर्माण संस्था, स्वयंसेवी संस्था आणि विविध सामाजिक घटकांना या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले.

स्वच्छतेची जबाबदारी नागरिकांनीही स्वीकारली

महापालिकेच्या यंत्रणेने केलेल्या प्रयत्नांना नागरिकांच्या सहकार्याची जोड मिळणे हे या कामगिरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. घरातूनच कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे, पुनर्वापरयोग्य वस्तूंचा योग्य विनियोग करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घेणे, अशा कृतींमधून नागरिकांनी स्वच्छता मोहिमेला बळ दिले. स्वच्छता ही केवळ महापालिकेची सेवा नसून, शहराच्या सामूहिक जीवनशैलीचा भाग व्हावी, या दृष्टीने जनजागृतीचे प्रयत्न करण्यात आले. महापौर रवि लांडगे म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिकेला मिळालेला महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान हा शहराच्या सामूहिक प्रयत्नांचा गौरव आहे. शहराच्या विकासात स्वच्छतेला मूलभूत स्थान असून, त्यासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांचीही सक्रिय भूमिका आवश्यक आहे. स्वच्छता सेवकांच्या श्रमांचा सन्मान आणि नागरिकांच्या सहभागातून मिळालेला हा पुरस्कार शहराच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्याबरोबरच राष्ट्रीय स्तरावरही शहराच्या कामगिरीची दखल घेतली गेली आहे. आगामी काळातही स्वच्छतेच्या बाबतीत अधिक चांगले मानदंड निर्माण करण्यासाठी आणि शहराचे हे स्थान कायम राखण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, स्वच्छ सर्वेक्षणातील महाराष्ट्र राज्यात मिळालेला प्रथम क्रमांक हा पिंपरी चिंचवड शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत गेल्या काही काळात सातत्याने घडवून आणलेल्या सकारात्मक बदलांची आणि सामूहिक प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावर मिळालेली पोचपावती आहे. शहराची स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि परिणामकारक करण्यासाठी महापालिका प्रशासनाने नियोजनबद्ध कार्यपद्धती, प्रभावी अंमलबजावणी आणि विविध विभागांमधील समन्वयावर विशेष भर दिला. कचऱ्याचे उगमस्थानी वर्गीकरण, नियमित संकलन, शास्त्रोक्त प्रक्रिया, पुनर्वापर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता या बाबींची काटेकोर अंमलबजावणी करण्यासोबतच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि क्षेत्रीय स्तरावरील देखरेख अधिक सक्षम करण्यात आली.

शेतकरी संकटात, संचालकांचा सत्कार मात्र थाटात

शेतकरी संकटात असताना सत्कार सोहळ्याच्या औचित्यावर प्रश्नचिन्ह

भिगवण । प्रतिनिधी

एकीकडे दुष्काळाच्या झळांनी शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना दुसरीकडे कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी संधी मिळालेल्या संचालकाचा जाहीर सत्कार सोहळा मोठ्या थाटामाटात व वाजतगाजत पार पडला. शेतकऱ्यांच्या अडचणींचा डोंगर कायम असताना झालेल्या या सत्कार सोहळ्यामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा संचालकांच्या सत्कारालाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे.



सध्या तालुक्यातील शेतकरी दुष्काळाच्या गंभीर संकटाला सामोरे जात आहे. पाण्याची टंचाई, घटलेले पीक उत्पादन, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि वाढता आर्थिक ताण यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणाऱ्या कारखान्याच्या संचालकांकडून त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची अपेक्षा होती. मात्र, या कठीण परिस्थितीत पार पडलेल्या सत्कार सोहळ्यावर आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

कारखाना अद्याप पूर्ण क्षमतेने चालू झाला नसताना तसेच दुसरीकडे आगामी गाळप हंगाम, उसाला मिळणारा दर आणि थकीत हप्त्याचा प्रश्न असे अनेक विषय प्रलंबित असताना संचालकांच्या सत्काराचा झालेला गाजावाजा चर्चेचा विषय ठरला आहे. या सोहळ्याच्या आयोजनासाठी कार्यकर्त्यांनीही मोठी धावपळ केली. मात्र, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी अशीच तत्परता दाखवली असती, तर त्याचा अधिक उपयोग झाला नसता का, असा सवाल आता तालुक्यातील शेतकरी विचारू लागले आहेत.

सहकारी साखर कारखान्याचे संचालकपद ही केवळ प्रतिष्ठा मिरवण्याची संधी नसून शेतकऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाची जबाबदारी आहे. ज्या शेतकऱ्यांच्या घामावर कारखान्याचे अर्थकारण उभे आहे, त्याच शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेत दिवस काढावे लागत असतील, तर सत्काराच्या झगमगाटापेक्षा त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक अधिक महत्त्वाची ठरते. फुलांचे हार आणि सत्काराचे सोहळे हा सन्मानाचा एक भाग असू शकतो; मात्र शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे हाच खरा लोकप्रतिनिधित्वाचा आणि संचालकपदाचा सन्मान आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या व्यथा जाणून घेणे, थकीत हप्त्याबाबत स्पष्टता देणे आणि उसाच्या दराबाबत ठोस भूमिका मांडणे, हीच काळाची गरज आहे. मग शेतकऱ्यांच्या या प्रश्नांना न्याय कधी मिळणार? याचे उत्तर विद्यमान संचालक देणार का हा प्रश्न सोहळ्याच्या निमित्ताने चर्चेत आला आहे.

कर्मयोगी कारखान्याची निवडणूक यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे बिनविरोध झाली. नवनिर्वाचित संचालक मंडळाने निवडून आल्यानंतर एवढे सत्कार घेत आहेत की ते तालुक्यातील दुष्काळ विसरून गेले आहेत. त्यांना खरंच जर सभासदांवर प्रेम असेल तर हारतुरे व सत्कारावर खर्च होणारी रक्कम ते दुष्काळग्रस्त सभासदांना मदत म्हणून देतील.

– ॲड.सुनील कन्हेरकर, (मार्गदर्शक– शेतकरी संघटना, इंदापूर)

श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्रीक्षेत्र देहूगावच्या वतीने गरीब गरजू महिलांना शिधा वाटप

देहूगांव । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र देहूगाव श्री संत तुकाराम महाराज संस्थान च्या वतीने दसरा दिवाळी तोचि माझा सण । सखे हरिजन भेटतील। या संत तुकोबांच्या अभंगा प्रमाणे दरवर्षी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान च्या वतीने प्रत्येक दिवाळीला, भक्ती संगीत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच अनुषणगाने दर वर्षी गोरगरीब गरजू महिलांना दिवाळी भेट म्हणून शिधा वाटप केला जातो. त्या प्रमाणे बुधवारी (ता.१०) रोजी सकाळी अकरा वाजता संस्थान चे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त दिलीप महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, वैभव महाराज मोर, लक्ष्मण महाराज मोरे आणि विक्रमसिंह मोरे यांच्या हस्ते दीडशे पेक्षा जास्त गोरगरीब कुटुंबातील



महिलांना शिधा वाटप करून श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

शालेय विद्यार्थी, कामगार यांना दिपावली निमित्त सुट्टी असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक भक्त, संत तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी देहूनगरीत दाखल झाले होते. त्यामुळे मुख्य मंदिर, वैकुंठस्थान मंदिर व परिसर भाविक भक्तांच्या उपस्थितीने फुलून गेला होता. दर्शन बरीच्या लागलेल्या लांबच्या लांब रांगेत, तासन तास उभे राहून भाविक भक्तांनी दर्शन घेतले. दररोज सकाळी भक्ती संगीत महोत्सवात वारकरी भाविक भक्त व स्थानिक नागरिकांना अनेक भजनी मंडळ व गायकांनी आपल्या सुरेल आवाजात अभंग व इतर भक्तीगीते सादर करून मंत्रमुग्ध करून टाकले. आज या भक्ती संगीत महोत्सवाची सांगता होणार आहे.

चिखलीत २४ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू; मृतदेहाजवळ दगड आढळल्याने खुनाचा संशय

पिंपरी । प्रतिनिधी

चिखली येथील स्पाइन रस्त्यावर घरकुल चौकाजवळ एका २४ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृत तरुणाचे पाय काळेनिळे पडलेले होते. तसेच, मृतदेहाजवळ दगड आढळल्याने त्याचा खून झाल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही घटना सोमवारी (दि. ९) सकाळी अकराच्या सुमारास उघडकीस आली.

लाल बहादूर राम (२४, रा. नेवाळेवस्ती, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे मृत तरुणाचे नाव आहे. चिखली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रणजित जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, घरकुल चौकाजवळ एका अनोळखी तरुणाचा मृतदेह पडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान मृतदेहाच्या अवस्थेवरून घातपाताची शक्यता व्यक्त करण्यात आली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पाठविला. तपासादरम्यान मृत तरुणाची ओळख पटली. तो नेवाळेवस्ती परिसरात राहून मजुरीसह मिळेल ते काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, शवविच्छेदन अहवाल आणि इतर पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. खुनाच्या संशयातून पोलिस संबंधित व्यक्तींचा शोध घेत आहेत.

फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे देहूगावात तीन ते चार ठिकाणी आग

मालमत्तेचे नुकसान; सुदैवाने जीवितहानी टळली

देहूगाव । प्रतिनिधी

दीपावली सणाच्या उत्साहात फटाके फोडताना घेतलेल्या निष्काळजीपणामुळे श्रीक्षेत्र देहूगाव परिसरात आगीच्या तीन ते चार घटना घडल्या. फटाक्यांतून उडालेल्या ठिणग्यांमुळे विविध ठिकाणी आग लागून मालमत्तेचे नुकसान झाले. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर देहूगावातील विविध रहिवासी तसेच वर्दळीच्या भागांमध्ये फटाक्यांच्या विक्रीसाठी दुकाने थाटण्यात आली होती. अशा गर्दीच्या आणि



रहिवासी भागांमध्ये फटाक्यांची विक्री करताना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची आवश्यकता असते. मात्र, फटाके फोडताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्याने आगीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे.

फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे लागलेल्या आगीत मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. जीवितहानी टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असला, तरी या घटनांमुळे फटाक्यांच्या विक्रीच्या ठिकाणी तसेच आतषबाजी दरम्यान सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रहिवासी आणि वर्दळीच्या परिसरात फटाक्यांची विक्री करण्यास परवानगी देताना प्रशासनाकडून पुरेशा सुरक्षा उपाययोजना केल्या जातात का? आगीच्या घटना रोखण्यासाठी अग्निसुरक्षेची साधने उपलब्ध असतात का? असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने फटाका विक्रीची ठिकाणे आणि सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर तपासणी करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

रावेतमध्ये फटाक्याच्या रॉकेटमुळे मैदानातील गवताला आग

रावेत । प्रतिनिधी

मुकाई चौक येथील आदर्शनगर परिसरातील मोकळ्या मैदानातील सुक्या गवताला फटाक्याचे रॉकेट पडल्याने आग लागल्याची घटना घडली. दिवाळीनिमित्त फोडण्यात आलेले रॉकेट मैदानातील सुक्या गवतावर पडल्याने गवताने पेट घेतला. काही वेळातच आगीने परिसरात फैलाव केला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांच्या तत्परतेमुळे आग पूर्णपणे विझविण्यात आली आणि मोठी दुर्घटना टळली.

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सब ऑफिसर सुनील फरांदे यांच्या नेतृत्वाखाली १० ते १२ अग्निशमन जवानांनी आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. जवानांनी तातडीने कार्यवाही करत आगीवर नियंत्रण मिळविले. त्यानंतर आग पूर्णपणे विझविण्यात यश आले. त्यामुळे आग जवळील परिसरात पसरण्याचा धोका टळला. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर परिसरात फटाक्यांची आतिषबाजी सुरू आहे. मात्र, मोकळ्या मैदानांमध्ये सुकलेले गवत असल्यास फटाक्यांच्या ठिणग्या किंवा रॉकेटमुळे आग लागण्याचा धोका निर्माण होतो. आदर्शनगरमधील घटनेत फटाक्याचे रॉकेट सुक्या गवतावर पडल्याने आग लागली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी फटाके फोडताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी. विशेषतः मोकळ्या मैदानांमध्ये, सुक्या गवताजवळ तसेच निवासी इमारतींच्या परिसरात फटाके फोडणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच घटनास्थळी पोहोचून केलेल्या प्रयत्नांमुळे आग पूर्णपणे विझविण्यात आली आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील यात्रेना प्रारंभ

खेड । प्रतिनिधी

तालुक्यातील पहिली यात्रा वरसुबाई दुसरी यात्रा धामणगाव तर तिसरी यात्रा औंढे येथे कोळोबा देवाची झाली असून दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता औंढे येथील ग्रामस्थांनी साध्या पद्धतीत यात्रा करण्याचे ठरवले होते व त्या पद्धतीने जास्त खर्चाच्या गोष्टी कमी करून दिवाळी व यात्रा साजरी करण्यात आली. कोळबा महाराजांची वार्षिक यात्रा ही डोंगरावरती असल्याने शेजारील अनेक गावांनी डोंगरावरती यात्रेनिमित्त गर्दी केली होती.



गावातील दुधाचे संकलन ४०० ते ५०० लिटर असून या दिवशी कोणीही दूध डेरी वर घालत नाही. सकाळी दुधाच्या कावडी डोंगरावरील देवाला दुग्धाभिषेक केला जातो. दुपारी पालखी डोंगरावर जाते. संध्याकाळी पालखी मिरवणूक नंतर भजनी भारुड व दुसऱ्या दिवशी हजेरी तसेच दुपारी आखाड्याचा कार्यक्रम होत असतो. त्यामुळे या यात्रेला अनेक भागातून कुस्ती शोकीन व अनेक गावातून लोक हजेरी लावत असतात परंतु यावेळी दरवेळीचा अंदाज पाहता दुष्काळी परिस्थिती असल्याने यावेळी गर्दीचे प्रमाण कमी पहावयास मिळाले. त्यावेळी अनेक दमदार नेत्यांनी हजेरी लावली. माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल भाऊ देशमुख, जिल्हा परिषद सदस्य समीर सुपे, पंचायत समिती सदस्य दिनेश हांडे, पश्चिम भागाचे नेते किरण मुके त्वचारोग तज्ञ व उद्योजक डॉक्टर सुशील सावंत, सभा विजय शिंदे यांनी उपस्थिती लावली. यावेळी गावचे सरपंच प्रदीप शिंदे, यात्रा कमिटी अध्यक्ष दत्ताभाऊ शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे, मुंबई मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे, उपसरपंच निलेश यादव, मा उपसरपंच धोंडीभाऊ शिंदे, पोलीस पाटील उल्हास शिंदे, ग्रामपंचायत सदस्य बबनराव शिंदे, मा. सरपंच व तंटामुक्ती अध्यक्ष सतीश शिंदे, अध्यक्ष विश्वनाथ शिंदे, मा. सरपंच अशोक शिंदे, चेअरमन नामदेव शिंदे, पुंडलिक शिंदे, मा अध्यक्ष मारुती शिंदे, अंकुश शिंदे, दत्ता मारुती शिंदे पाटील, बुवा शिंदे, नवनाथ शिंदे, माऊली आवळे, ज्ञानदेव गोपाळे यांच्यासह गावातील अनेक आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.